कृषीवल
रायगड, शुक्रवार, दि. १९ जुलै २०२४
किंमत ४ ₹

## ‘पाडायचे की निवडून द्यायचे हे ठरवणार’

**जालना :** मराठा आरक्षणाचा मुद्दा राज्यात पुन्हा एकदा पेटणार असून, आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे २० जुलैपासून पुन्हा उपोषणाला बसणार आहेत, अशी माहिती जरांगे पाटील यांनी आज माध्यमांशी बोलताना दिली. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत २८८ जागा लढवण्याबद्दल विचारले असता जरांगे पाटील म्हणाले की, मी २० तारखेला उपोषणाला बसतोय, त्या दिवशी मराठा समाजाची किती तारखेला बैठक घ्यायची ते ठरवले जाईल. त्याच दिवशी मराठा समाजाला विचारून मी ठरवणार आहे की, २८८ निवडून आणायचे की पाडायचे.

## जीप विहिरीत कोसळून सात भाविक ठार

**जालना :** जालना ते राजूर मार्गावर भरधाव काळ्या-पिवळ्या जीप आणि दुचाकीची धडक होऊन जीपच्या चालकाचे नियंत्रण चुकल्याने जीप थेट विहिरीत कोसळून मोठा अपघात झाला. या गंभीर अपघातात सात भाविक ठार झाले, तर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना जालना येथील रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे. या जीपमध्ये एकूण १३ प्रवासी भाविक दाटीवाटीने बसले होते, अशी माहिती उघडकीस आली आहे. जालना ते राजूर मार्गावर तुपेवाडीजवळ खडेश्वर बाबा मंदिर ते वसंत नगर येथे हा अपघात झाला.




**आजचा अग्रलेख**
**पैशांची ‘लाडकी’ फेकाफेक**

**वेधक**

## ‘नीट’चा निकाल प्रकाशित करा

**नवी दिल्ली :** नीट यूजी पेपर लीकप्रकरणी गुरुवारी (१८ जुलै) सर्वोच्च न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. या सुनावणीत सरन्यायाधीशांनी एनटीए (नॅशनल टेस्टिंग एजन्सी) ला उमेदवारांची ओळख लपवून शहर आणि केंद्रनिहाय निकाल प्रकाशित करण्याचे आदेश दिले आहेत. एनटीएनं हे निकाल त्यांच्या अधिकृत वेबसाइटवर प्रकाशित करावेत, असं सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड म्हणाले. न्यायमूर्ती परडीवाला, न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठानं गुरुवारी वादग्रस्त नीट परीक्षाशी संबंधित सर्व याचिका निकाली काढल्या आहेत. प्रत्येक परीक्षा केंद्राचा निकाल स्वतंत्र जाहीर करावा, असा आदेश देत या प्रकरणाची पुढील सुनावणी सोमवारी (२२ जुलै) होणार असल्याचंही सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी सांगितलं. तसेच ईओडब्ल्यू अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

# आमदारांची सत्ता, विकास बेपत्ता ?

## निधीचा बोलबाला, कामांचा ठणठण गोपाळा

## कागदावरच्या विकासाविरोधात जनतेच्या मनात खदखद

**| रायगड | खास प्रतिनिधी |**

**विकासाच्या नावाने गमजा मारणाऱ्या सत्ताधाऱ्यांचे पितळ आता उघडे पडत आहे. हजारो कोटींच्या निधीचा बोलबाला करुन प्रत्यक्षात विकासाच्या नावाने ठणठण गोपाळ असे चित्र रायगड जिल्ह्यात विशेष करुन अलिबाग-मुरुड विधानसभा मतदारसंघात दिसून येते. स्थानिक आमदारांनी एमएमआरडीसह विविध योजनांच्या माध्यमातून हजारो कोटी रुपयांचा निधी आणल्याची ओरड केली. मात्र, प्रत्यक्षात गेल्या पाच वर्षात ठोसपणे विकासाचे कोणतेच काम मतदारसंघात झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे आमदारांनी कागदावर दाखवलेल्या विकासाबद्दल आता जनतेच्या मनात सवाल उपस्थित होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.**

आमदारांसह त्यांच्या बगलबच्च्यांनी सत्तेचा उपभोग घेऊन आता पाच वर्षांचा काळ संपत आला आहे. पुढील दोन-तीन महिन्यांमध्ये आता विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे मतदारसंघात विकासाचा मुद्दा आता उघडपणे चर्चीला जात आहे. आमदारांच्या



**कामाच्या नुसत्या बाता**

**जे बोलतो तेच करतो, असे समाज माध्यमांच्या माध्यमातून शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी यांनी सातत्याने जनतेच्या माथी मारण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, कोटीच्या कोटी उड्डाणे करुनदेखील प्रत्यक्षात कामाची एक वीटदेखील लागली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे नुसती जाहिरातबाजी करणाऱ्यांनी आपली नैतिक जबाबदारी म्हणून ही कामे का पूर्ण झाली नाहीत, याची कारणे जनतेला, पर्यायाने मतदारांना सांगणे अनिवार्य नाही का? कोट्यवधींचे आकडे दाखवून मतदारांना अधिक काळ भुलवता येणार नाही. यासाठी जनतेचे प्रश्न तडीस नेणे गरजेचे असते.**

कामाचे मूल्यमापन करण्यास मतदारांनी सुरुवात केली आहे. गेल्या पाच वर्षांत हजारो कोटींचा निधी मतदारसंघात आणल्याची ओरड केली जात आहे. त्यामध्ये प्रामुख्याने रेवस-करंजा पुलासाठी सुमारे तीन हजार ५०० कोटी, अलिबाग तालुक्यातील सांबरकुंड धरणाच्या कामासाठी तब्बल दोन हजार कोटी, अलिबाग-रोहा रस्त्यासाठी सुमारे २०० कोटी आणल्याचे आमदारांसह त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी जाहीर कार्यक्रमांतून सांगितले आहे.

पान २ वर

# रिल्स बनवणं जीवावर बेतलं

- **रिल्स स्टार अन्वीचा ३०० फूट दरीत कोसळून मृत्यू**
- **माणगावच्या कुंभे येथील धक्कादायक घटना**

**| रायगड | प्रतिनिधी |**

माणगाव तालुक्यातील कुंभे येथे पर्यटनासाठी आलेल्या मुंबईतील रिल्स स्टार तरुणीचा इन्स्टाग्रामसाठी रिल करताना निसरड्या कड्यावरुन तोल जाऊन ३०० फूट खोल दरीत पडून मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना बुधवारी (१७) घडली. अनवी कामदार (२७) असं या तरुणीचं नाव असून, ती व्यवसायानं चार्टर्ड अकाऊंटंट होती. तर, सोशल मीडियावर इन्फ्ल्यूएन्सर म्हणून ती नावारूपास आली होती. परंतु, तिचा हा प्रवास आणि रिल हा दुर्दैवाने तिच्या जीवावर बेतला.



मिळालेल्या माहितीनुसार, अन्वी कामदार आपल्या सात सहकाऱ्यांसह वर्षासहलीसाठी माणगावमधील कुंभे इथं आली होती. एका कड्यावर इन्स्टाग्रामसाठी रील बनवत असताना तोल जाऊन ती ३०० फूट दरीत कोसळली. तिच्या सहकाऱ्यांनी यासंदर्भातील माहिती माणगाव पोलीस ठाण्यात कळवली. माणगावचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निवृत्ती

पान २ वर

## नेरळ ग्रामपंचायतीमध्ये भूकंप

**सरपंच वगळता सर्व १५ सदस्यांचे राजीनामे**

**| नेरळ | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठ्या समजल्या जाणाऱ्या कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायतीमध्ये गुरुवारी (दि. १८) भूकंप झाला. सरपंच उषा पारधी या विकासकामांकडे दुर्लक्ष करीत असल्याचे कारण देत सर्वच्या सर्व १५ सदस्यांनी आपल्या पदाचे राजीनामे सरपंचांकडे सुपूर्द केले आहेत. याप्रकरणी भ्रष्टचाराचे आरोप झालेल्या महिला सरपंच उषा पारधी यांनी आपण राजीनामा देणार नाही, अशी भूमिका घेतली आहे.

पान २ वर

> **सदस्यांनी आपल्या पदाचे राजीनामे कशासाठी दिलेत याबाबत मला कोणतीही कल्पना नाही. माझ्यावरती केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपाबद्दल मला कोणत्याही प्रकारची माहिती नाही. त्याबद्दल मला कधीही ते काही बोलले नाही. माझे पती कृष्णा पारधी यांनी काही कुठे सह्या केल्या असतील तर त्यांनी ते सिद्ध करावे. कुठल्या कर्मचाऱ्यांनी काही भ्रष्टाचार केला असेल तर सिद्ध करावे. मात्र, मी माझ्या पदाचा राजीनामा देणार नाही.**
> **- उषा पारधी, सरपंच**

## लाखो लीटरचा डिझेलसाठा जप्त

**स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची कारवाई**

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

बेकायदेशीररित्या डिझेलची तस्करी करणाऱ्या बोटीवर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने छापा टाकला. या छाप्यात ३६ लाख ४० हजार रुपये किमतीचा डिझेलचा साठा जप्त केला असून, चौघांना अटक करण्यात आला आहे. ही घटना १७ जुलैला घडली असून, याप्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

समुद्रमार्गे एक बोटी रेवस जेट्टी येथील किनारी डिझेल घेऊन येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला मिळाली. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार, पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांनी पोलीस उपनिरीक्षक लिंगप्पा सरगर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रसाद पाटील, संदीप पाटील, राजा पाटील, पोलीस हवालदार यशवंत झेमसे, राकेश म्हात्रे, सुधीर मोरे यांचे एक पथक तयार केले. या पथकामार्फत कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. १७ जुलै रोजी पथकाने रेवस बंदरावर सापळा रचला. त्यावेळी एक बोट किनारी येऊन थांबल्याचे दिसून आले. पथकाने तात्काळ छापा टाकून बोटीसह चौघांची चौकशी केली. त्यावेळी बोटीमध्ये ३३ हजार लीटर डिझेलचा साठा अनधिकृतपणे आढळून आला. त्याची किंमत ३६ लाख ४० हजार रुपये किंमत असून, चौघांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याविरोधात मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील तीन आरोपी बोडणी येथील असून, एकजण उत्तर प्रदेशमधील असल्याची माहिती समोर येत आहे.

## आयएएस पूजा खेडकरच्या आईला महाडमधून अटक

- **पुणे ग्रामीण पोलिसांची कामगिरी**
- **पिस्तूल दाखवून शेतकऱ्यांना दमदाटी करणं भोवलं**

**| महाड | प्रतिनिधी |**

राज्यभरात चर्चेत असलेल्या वादग्रस्त आयएएस पूजा खेडकरची आई मनोरमा खेडकरला पुणे ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मनोरमा खेडकरचे काही दिवसांपूर्वी स्थानिक शेतकऱ्यांना धमकावतानाचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. पुणे पोलिसांशीदेखील त्यांनी हुज्जत घातली होती. गेल्या काही दिवसांपासून मनोरमा खेडकरचा तपास पोलीस करत होते. अखेर गुरुवारी (दि. १८) पोलिसांनी मनोरमा



खेडकरला महाड तालुक्यातील रायगड पार्वती निवास या हॉटेलमधून अटक केली आहे. स्थानिक तालुका पोलीस ठाण्यात नोंद करुन पुणे पौंड पोलीस पुण्याला घेऊन गेले. मनोरमा खेडकर या हॉटेलमध्ये लपून बसल्याची माहिती प्राप्त झाली होती.

मनोरमा खेडकर यांनी रात्री १० वाजण्याच्या सुमारास पार्वती निवास हॉटेलमध्ये त्यांनी रूम बुक केला. त्यांच्याबरोबर एक व्यक्ती होता. त्यांनी आपला मुलगा सांगितले. या दोघांनी हॉटेल मालकाला

पान २ वर

# डोंगर एका रात्रीत गाव गिळेल

## डांगी आदिवासींची व्यथा, इर्शाळवाडीसारख्या दुर्घटनेची भीती

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील कुर्डुसपासून सात किमी डोंगरावर असलेल्या डांगी आदिवासीवाडीवर दरड आणी भूस्खलनाचे संकट ओढवले आहे. या वाडीत २०० घरांचा उंबरठा असलेली लोकवस्ती असून, नवजात बालक, महिला, तरुण आबालवृद्ध या ठिकाणी वास्तव्यास आहेत. गावालगतचा डोंगर व माती खचून मोठ्या दुर्घटनेची चाहूल गावकऱ्यांना लागली आहे. डांगी आदिवासी वाडीच्या सभोवताली तीन किलोमीटरपर्यंत डोंगर खचून मोठ मोठ्या भेगा पडल्या आहेत. या भेगा मानवी वस्तीलगत आल्याने रहिवासी भयभीत झाले आहेत. एखाद्या रात्री अख्खे गाव या भेगा गिळून टाकेल, अशा भीतीने गावकरी त्रस्त आहेत. अशातच या भेगांमुळे येथील पिकत्या शेतजमिनीचेदेखील मोठे नुकसान झाले आहे. भूगर्भात भयानक हालचाली सुरू असून, हळूहळू संपूर्ण गाव मातीत गाडले जाण्याची भीती ग्रामस्थांना सतावत आहे.

पान २ वर





● (छायाचित्र : धम्मशील सावंत)



## ढाब्यामध्ये घुसला भरधाव टँकर

- **चालकाचा उपचारादरम्यान मृत्यू**

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटाच्या उतारावर सोना ढाब्यासमोरील अपघाताचे सातत्य कायम असून, याठिकाणी अचानक डावीकडील लेनवर भरधाव वेगाने जाणाऱ्या टँकरच्या चालकाचा ताबा वाहनावर न राहिल्याने टँकर थेट सोना ढाब्यामध्ये घुसला. यावेळी टँकर चालकाच्या छातीमध्ये ढाब्याच्या छपराचा चालकाच्या केबिनची काच फोडून आलेला लोखंडी पाईप घुसला. पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये दाखल केल्यानंतर काही

पान २ वर





## पेणच्या गणेशमूर्तीला ‘जीआय’ प्रमाणपत्र प्रदान

**| अलिबाग | प्रतिनिधी |**


जगप्रसिद्ध असलेल्या पेणच्या गणेशमूर्तींना भौगोलिक मानांकन प्राप्त झाला असून, त्याचे प्रमाणपत्र जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते मूर्तीकारांना देण्यात आले. जीआय मानांकनामुळे पेणमधील गणेशमूर्तींची आणखी वेगळी ओळख निर्माण झाल्याने पेणच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला.

> **पेणमधील गणेशमूर्तीला जीआय मानांकन प्रमाणपत्र मिळाल्याने खूप आनंद झाला आहे. पेणमधील मूर्तीची एक वेगळी ओळख यातून निर्माण झाली आहे. मूर्तीची नक्कल करणाऱ्यांना यातून लगाम बसणार आहे.**
> **- श्रीकांत देवधर,** अध्यक्ष, श्रीगणेश मूर्तीकार व व्यवसायकार गणेश कल्याणकारी मंडळ



पेणमध्ये सुमारे एक हजारांहून कारखाने आहेत. पेण शहराबरोबरच ग्रामीण भागातदेखील मूर्ती तयार केल्या जातात. पेणच्या गणेशमूर्ती आकर्षक, रेखीव असल्याने रायगडसह पुणे, मुंबई तसेच देशविदेशातदेखील त्यांना प्रचंड मागणी आहे.

या व्यवसायातून हजारो लोकांना रोजगार मिळत आहे. पेणमधील गणेशमूर्तींना जीआय मानांकन मिळावे यासाठी मूर्तीकारांकडून शासनाकडे मागणी करण्यात आली होती. चेन्नई येथील जीआय नोंदणी कार्यालयाला प्रस्ताव सादर केला होता. गणेशमूर्तींना मानांकन मिळाले होते. मात्र, प्रमाणपत्राची प्रतीक्षा लागून राहिली होती. अखेर ही उत्कंठा संपली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते जीआय मानांकनाचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या मानांकनामुळे पेणच्या मूर्तीची वेगळी ओळख निर्माण राहणार असून, फसवणूक थांबण्यास मदत होणार आहे.





# मूर्तीकारांना मोफत शाडूची माती

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवांतर्गत महापालिकेचा स्तुत्य उपक्रम

**। पनवेल । वार्ताहर ।**

**महानगरपालिका क्षेत्रामध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी माझी वसुंधरा ४.० अंतर्गत महापालिकेच्यावतीने यावर्षीदेखील 'बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा' मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत नागरिकांना कमी किमतीत शाडू मूर्ती उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेच्यावतीने महापालिका कार्यक्षेत्रातील दहा गणेश मूर्तीकारांना मोफत बारा टन शाडूची माती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.**



नागरिकांनी शाडूच्या अगर लाल मातीच्या गणेशमूर्ती खरेदी करून पर्यावरणपूरक गणोशोत्सव साजरा करावा, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनेनूसार सर्व सण व उत्सव पर्यावरणपूरक साजरे करणे बंधकारक आहे. गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाचा सण आहे. त्यामुळे महापालिका कायक्षेत्रात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला जास्तीत जास्त चालना देण्यासाठी मागील वर्षीप्रमाणे यावर्षीदेखील 'बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा' मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्यावतीने पालिका क्षेत्रातील चारही प्रभागात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती विक्रेत्यांना जागा उपलब्ध करुन देणे व मूर्तीकारांना शाडूची माती उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. जेणेकरुन पनवेल महानगरपालिका क्षेत्रात प्लास्टर ऑफ पॅरिस गणेशमूर्तीच्या वापरामध्ये घट होईल, तसेच पनवेल महागनरपालिका क्षेत्रातील तलावांचे व नदीचे पाण्याचे प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. गणोशोत्सव साजरा करताना केवळ पर्यावरणपूरक गणेशमूर्तीच नाही तर गणपती बाप्पाची सजावटदेखील पर्यावरणपूरक करून गणेशाची आराधना आणि पर्यावरण रक्षणाची जबाबदारी अशा दोन्हींची ही मंगलमय सांगड घालून यावर्षीच्या गणेशोत्सवाचा आनंद द्विगुणित करुया, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

---

# दुर्मिळ पिसुरी हरिणाला जीवदान

## पुढील उपचारासाठी पुण्यास रवाना





**। उरण । वार्ताहर ।**

चिर्ले येथील मानवी वस्तीत जखमी अवस्थेत पिसुरी हरिण आढळून आले होते. वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेच्या सदस्यांनी या जखमी पिसुरी हरिणाला ताब्यात घेऊन उरण वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली पुढील उपचारासाठी वाईल्ड लाईफ प्रोटेक्शन रिसर्च सेंटर पुणे येथे पाठविण्यात आले.

चिर्ले ग्रामपंचायत हद्दीतील डोंगर भागात स्थानिक ग्रामपंचायत, महसूल व वन विभाग यांच्या साटेलोटे कारभारामुळे कंटेनर यार्ड, गोदाम, दगड खाणी व्यावसायिकांनी शिरकाव केल्याने वन्यजीव मानवी वस्तीत येऊ लागले आहेत. त्यातच समवेदा सावला यार्डजवळ एक वेगळा असा दिसणारा प्राणी तेथील कामगार प्रथमेश मढवी यांनी पाहिला. मात्र, त्या प्राण्याची ओळख नसल्याने चिर्ले येथील वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेचे सदस्य सर्पमित्र नितीन मढवी यांना या प्राण्याची माहिती दिली. नितीन मढवी व त्याचे सहकारी रोहित पाटील, ऋषभ पाटील, कुणाल घरत, कुंदन पाटील यांनी लगेचच घटनास्थळी हजर राहून त्या जखमी प्राण्याला पकडले. त्यानंतर वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी यांना माहिती दिली. या प्राण्याची ओळख पिसुरी हरीण असून, तो दुर्मिळ असल्याचे विवेक केणी यांनी सांगितले.

दुर्मिळ प्राण्याची माहिती वन्यजीव निसर्ग संस्थेने वनविभागाचे उरण अधिकारी नथुराम कोकरे यांना दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे येथील वाइल्ड लाईफ प्रोटेक्शन रिसर्च सेंटर येथे उपचारासाठी पाठविल्यात आले. यावेळी वनवीभाचे वनरक्षक संतोष इंगोले, राजेंद्र पवार, अनिकेत झेंडे, वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेचे सदस्य महेश भोईर, नितीन मढवी, सुमित मढवी, सिद्धार्थ मढवी, मनीष मढवी, प्राणी पक्षी निरीक्षक निकेतन ठाकूर आदी उपस्थित होते.

---



# चिवे येथे मुलांना शैक्षणिक मदतीचा हात

## रघुनाथ वाघमारेंच्या वाढदिवसानिमित्त स्तुत्य उपक्रम

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील हातोंडचे सुपुत्र आयु. रघुनाथ वाघमारे यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून वाघमारे कुटुंबियांनी आदिवासी आश्रमशाळेतील सुमारे साडेतीनशे मुलांना शैक्षणिक साहित्य देऊन खाऊ वाटप केले. सामाजिक बांधिलकी जपत साजरा केलेला वाढदिवस सर्वांना प्रेरणा देणारा ठरत आहे.

यावेळी वाघमारे कुटुंबातून आयु. सुनंदा रघुनाथ वाघमारे, आयु. राजेंद्र, सिद्धार्थ, राहुल, आयु. अर्चना, रागिणी, सोनल, आयु. संध्या, मीनाक्षी, आयु. मिलिंद कासारे, आयु. विकास म्हस्के, स्नेहल, दीक्षा कासारे, ईशीता, अपर्णा, कुणाल, शौर्य यांच्यासह मुख्याध्यापक आयु. जे.एम. गुरव, आयु. एस.व्ही. पिंगळे, आयु. एस.एल. चव्हाण, आयु. आर.डी. काळे आदी उपस्थित होते.

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. जामरूंग, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकतीचे मालक १) श्री. चंद्रकांत श्रीकांत सिंग २) श्री. शंकर चंद्रन चेट्टीयार यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे/हिस्सा नंबर. | प्लॉट नंबर | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| ४८/९ | १ | १-९४-00 | १९-४0 |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक १९/०७/२०२४

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो.८१४९९४१८५२

---

## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी मौजे पवेळे येथील खालील वर्णनाची मिळकत आजमितीस सुंदरी काशिनाथ थळे यांचे नांवे ७/१२ कडे आहे.

| सर्व्हे /गट नंबर | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ३ | 0 | 0-८५-00 | १=६९ |

सदर मिळकत सुंदरी काशिनाथ थळे यांचे नांवे तोंडी वाटपाच्या नोंदीनुसार केल्याचे दिसत आहे. मात्र सदर मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत असून, सदर मिळकतीमध्ये आमचे अशिल श्री. रमेश गणपत थळे, श्री. सुरेश गणपत थळे, श्री. नागुनाथ गणपत थळे, श्री. अनंत गणपत थळे व श्री. राम गणपत थळे या आमचे अशिलांचा सदर मिळकतीमध्ये हक्कहितसंबंध आहे. सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांची घरे असून ताबा देखील पूर्वापारपासूनच आमचे अशिलांकडेच आहे. त्यामुळे आमचे अशिलांचा जो अविभक्त हिस्सा आहे तो निर्तुटक झाल्याशिवाय कोणत्याही प्रकारे विक्री, गहाण, बक्षीस अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार होणेस आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. सुंदरी काशिनाथ थळे यांचे एकटीचे सदर जमिनीचे ७-१२ कडे नांव असल्याने सदर मिळकतीची विकी करण्याचा सुंदरी काशिनाथ थळे यांचा विचार असल्याची माहिती आमचे अशिलांस मिळाली आहे.

तरी, सर्वास या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, वर नमूद मिळकतीबाबत अथवा सदर मिळकतीच्या कोणत्याही भागाबाबत कोणीही सुंदरी काशिनाथ थळे यांचेबरोबर कसल्याही स्वरूपाचा व्यवहार करणेंस आमचे अशिलांची वर नमूद कारणांकरिता सक्त हरकत आहे. याउपर कोणीही सदर मिळकतीबाबत व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर ठरेल व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

तारीखः १९/०७/२०२४

सही/-
**ॲड. संजीव अनिल घरत,**
ऑफीस पत्ता मु. पो. खंडाळे
ता. अलिबाग जि. रायगड

---

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)

ज.म.र. अर्ज १६/२०२४

### जाहीर नोटीस

प्रति,
श्री. रमेश कृष्णा भोईर
रा. मु. भिलजी, पो. बापले — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुद्ध

ग्रुप ग्रामपंचायत बोरघर,
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे भिलजी, पो. बापळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे वडील कै. कृष्णा काशिनाथ भोईर यांना मृत्यु दि ०६/०५/२०१५ रोजी भिलजी येथील राहत्या घरी झाला होता.

मृत्यू नोंदीचे २. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत बोरघर येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत बोरघर यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन दि. १९/०७/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार / निर्णय देणेत येईल यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.१९/०७/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : ४/७/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

---

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता''असे उल्लेखित) संदर्भामध्ये (''मालक'') राजेंद्र अनंत शिरगांवकर, सुधिर अनंत शिरगांवकर, बळवंत अनंत शिरगांवकर, धनंजय अनंत शिरगांवकर, देवयानी देवेंद्र सार्दळ, तेजस सुनिल पेडणेकर यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची (मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - झिराड, तालुका-अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १५७, एकूण क्षेत्र १-४७-४० (हे.आर.चौ.मी.) आकार २५ रु.१५ पै. आणि भूमापन क्रमांक व उपविभाग १५८, एकूण क्षेत्र ०-६२-७० (हे.आर.चौ.मी.) आकार ४ रु.३० पै.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १९/०७/२०२४

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

---

**पान १ वरून**

# आमदारांची सत्ता, विकास बेपत्ता?

हा निधी कमी पडला म्हणून आत्या नव्याने जिल्हा सरकारी रुग्णालयाच्या सात मजली इमारतीसाठी १५० कोटी ६० लाख रुपयांचा निधी, तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या शिवतीर्थ इमारतीसाठी ७७ कोटी रुपये मंजूर केल्याचे नुकतेच जाहीर केले आहे. त्यामुळे मतदारसंघात हजारो कोटी रुपयांचा निधी येत असेल, तर विकास हा दिसलाच पाहिजे ना. परंतु, मतदारसंघात विकास झाल्याचे स्पष्ट चित्र अद्याप तरी दिसत नाही. त्यामुळे मतदार राजाच्या मनात विकासाबाबत प्रश्न निर्माण होत आहेत. रायगडचे पालकमंत्री उदय सामंत हे नियोजन समितीच्या बैठकीसाठी अलिबाग येथे आले होते. त्यांना याप्रश्नी छेडले असता, तेदेखील समर्पक उत्तर देऊ शकले नाहीत. त्यामुळे आगामी काळात जनतेच्या मनातील विकासाबद्दलचा आक्रोश बाहेर पडण्यास सुरुवात झाल्यास नवल वाटायला नको.

# रिल्स बनवणं जीवावर बेतलं

बोराडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी स्थानिक बचाव पथकांना पाचारण केलं. दोरीच्या सहाय्यानं बचाव पथकं दरीत उतरली. यावेळी अन्वी गंभीर जखमी अवस्थेत असल्याचं आढळलं. तिला तात्काळ स्ट्रेचरच्या सहाय्यानं दोरीनं ओढून वर काढण्यात आलं. मात्र, माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात नेण्यापूर्वी तिचा मृत्यू झाला होता.

# पूजा खेडकरच्या आईला महाडमधून अटक

त्यांची नावे पण खोटी सांगितली. दादासाहेब ज्ञानदेव ठाणगे, इंदुबाई ज्ञानदेव ठाणगे असे नाव सांगून रूम बुक केला. त्यावेळी अडीचच्या सुमारास पुणे ग्रामीण पौंड पोलीस आणि महाड तालुका पोलीस हे तपासाला आले होते. त्यांनी त्या हॉटेल मालकाला मोबाईलमधील फोटो दाखवून या व्यक्तींची विचारपूस केली. हॉटेल मालकांनी पोलिसांना या व्यक्ती आमच्या हॉटेलमध्ये रात्री आल्याचे सांगितले. त्यानुसार या व्यक्तींची ओळख पटली आणि सकाळी साडेसहाच्या सुमारास पुणे ग्रामीण पोलिसांनी दोघांना अटक केली. याबाबतची माहिती स्वतः पार्वती निवास हॉटेलचे मालक अनंत औकीरकर यांनी दिली. पोलिसांची तीन पथकं त्या ठिकाणी शोध घेत होती. पूजा खेडकरच्या बाणेर येथील बंगल्यावर जाऊन पोलिसांनी मनोरमा खेडकर असल्याची पाहणी केली होती. त्यावेळी तिने पोलिसांना दाद दिली नव्हती. नंतर घराच्या गेटवरती कुलूप लावल्याचं निर्दशनास आलं होतं. फोनदेखील बंद असल्याचं समोर आलं होतं. त्यानंतर पोलिसांची तीन पथकं मनोरमा खेडकरसह इतरांचा शोध घेत होते. गुरुवारी अखेर पुणे ग्रामीण पोलिसांनी मनोरमा खेडकरला रायगडमधून अटक केलं आहे.

अनेक दिवसांपासून मनोरमा खेडकरचा शोध पोलिसांकडून सुरू होता. खेडकरांच्या घराबाहेर नोटीसदेखील लावण्यात आली होती. पुणे ग्रामीण पोलिसांचं पथक मनोरमा खेडकरला पुणे पौंड पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले. त्यानंतर पुणे ग्रामीण रुग्णालयामध्ये त्यांची वैद्यकीय तपासणी केली. पुणे ग्रामीण पौंड पोलीस पुढील तपास करीत आहेत.

**ओळख लपवून रुमची बुकिंग**

मनोरमा खेडकर यांनी आपली ओळख लपविण्यासाठी स्वतःचे नाव इंदुबाई ज्ञानदेव ठाणगे आणि सोबत असणारा आपला मुलगा दादासाहेब ज्ञानदेव ठाणगे असल्याचे खोटे सांगून रुम बूक केल्याची माहिती पार्वती निवास हॉटेलचे मालक अनंत औकीरकर यांनी दिली.

# ढाब्यामध्ये घुसला भरधाव टँकर

वेळातच या चालकाची मृत्यूसोबतची झुंज अपयशी ठरली. पोलादपूर तालुक्यातील चोळई गावाच्या हद्दीतील चोळई गावठाण बाजूच्या सोना ढाबा हॉटेलसमोर महामार्गाची अचानक लेन बदलण्याच्या परिस्थितीमुळे अपघातप्रवण क्षेत्र निर्माण झाले आहे. कशेडी घाटातील रस्त्याचा तीव्र उतार असल्याने या ठिकाणी वेगावर नियंत्रण ठेवताना वाहनावरदेखील नियंत्रण ठेवणे वाहनचालकांना कठीण होत असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. गुरूवारी दुपारी सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास कशेडी घाटातून लक्ष्मीलाल भुरालाल मिनारीया (५४, रा. रूनदेड, उदयपूर, राजस्थान) हा टँकर (क्रमांक जीजे १८ एएम ३३८७) घेऊन भरधाव वेगाने घेऊन कशेडी घाटरस्ता उतरून पोलादपूरच्या दिशेला जात असताना डावीकडील लेनवर जाण्यासाठी स्टेअरिंग वळविल्यानंतर ते पुन्हा सरळ करता आले नाही. परिणामी, टँकर भरधाव वेगाने रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या हॉटेल सोना ढाबाच्या इमारतीमध्ये घुसला. यावेळी ढाब्याच्या छपराचा लोखंडी पाईप ड्रायव्हर केबिनची काच फोडून आत आला आणि चालक लक्ष्मीलाल मिनारिया याच्या छातीमध्ये डाव्या बाजूला घुसला. यावेळी पोलादपूर ग्रामीण रूग्णालयाच्या रूग्णवाहिकेतून पोलादपूर पोलिसांनी चालकाला ग्रामीण रूग्णालयामध्ये दाखल केले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पोलादपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल जाधव, सहायक पोलीस उपनिरीक्षक जागडे, पोलीस हवालदार स्वप्नील कदम, पोलीस शिपाई कोळी आणि वाहतूक पोलीस धायगुडे यांनी घटनास्थळी पोहोचून तातडीने जखमीला रूग्णालयात दाखल करण्यासह अन्य पंचनामा व वाहतूक सुरळीत करण्याकामी तत्परता दाखविली.

# नेरळ ग्रा.पं.मध्ये भूकंप

नेरळ ग्रामपंचायतीमधील राजकारण आता थेट जनतेसमोर आले आहे. महिला सरपंच उषा पारधी या मनमानी करून प्रशासन चालवतात असा आरोप करून सरपंच वगळता अन्य सर्व १५ सदस्यांनी आपल्या पदाचे राजीनामे सरपंचांकडे दिले आहेत. नेरळ ग्रामपंचायतीमधील या राजकीय भूकंप आणि घडामोडींमुळे सुप्त राजकारण बाहेर आले आहे.

सरपंच उषा पारधी यांनी प्रशासन चालविता एकांगी कारभार केला, असा आरोप करून सरपंच वगळता अन्य सर्व १५ सदस्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले. सरपंच उषा पारधी यांची भेट घेऊन सर्व सदस्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले. त्यात सत्ताधारी गटाचे ११ आणि विरोधी गटाच्या चार सदस्यांचा समावेश आहे. राजीनामा देणाऱ्या सदस्यांमध्ये उपसरपंच मंगेश म्हसकर, सदस्य राजन लोभी, संतोष शिंगाडे, श्रद्धा कराळे, शंकर घोडविंदे, पार्वती चंचे, गीतांजली देशमुख, उमा खडे, शिवाली पोतदार, तर विरोधी पक्षाचे प्रथमेश मोरे, नितीन निरगुडे, शारदा सालेकर, पार्वती पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अतुल चंचे आदी सर्व सदस्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत. दरम्यान, सर्व सदस्यांचे राजीनामे माझ्याकडे सरपंचांकडून आले आहेत. त्या सर्व सदस्यांचे राजीनामे सह्यांची पडताळणी करण्यासाठी विशेष सभेत ठेवले जातील. त्यानंतर सभेच्या निर्णयाचा अहवाल कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना पाठवून दिला जाईल, अशी माहिती ग्रामविकास अधिकारी अरुण कार्ले यांनी दिली.

# ..रात्रीत गाव गिळेल

दरम्यान, ग्रामस्थ महादेव रामा भवर यांनी सांगितले की, आमच्या गावात अतिशय दुर्घटनेची अवस्था आहे. पाच-सहा वर्षे जमिनीला भेगा पडतात, शासन कुणी लक्ष द्यायला तयार नाहीत. इर्शाळवाडीसारखी भयानक घटना घडेल असं वाटतंय. १०० फुटांच्या अंतरावर आमचं गाव आहे. आमचा संपूर्ण गाव डोंगराखाली गाडला जाणार आहे. कुणी वाचणार नाही, सरकारने आमचे जीव वाचवावे, अशी हाक भवर यांनी दिली. येथील रहिवासी अर्चना ठोंबरे म्हणाल्या की, आमच्या गावात अशी परिस्थिती आहे की, जगणं मुश्किल झाले आहे. आज इथं आम्ही सर्व लोक दिसतोय, उद्या इथं काही झाले तर कुणीच दिसणार नाही. मेल्यावर इथं येऊन काय भेटेल, पाच-पाच लाख; परंतु, त्या पैशाने माणसं परत येतील का? रोज जमीन फाटत जाते, गुरं जमिनीत गाडली जातात, आता माणसं पण जमिनीत गाडली जातील, एवढी भीती वाढली आहे. शेतकरी नांग्या ठोंबरे यांनी, शेतीला भेगा पडल्या, आमची दीड एकर शेती गेली. आम्ही खावं काय, जगावं कसे, दरवर्षी भेगा पडतात. महागाई वाढली, मुलंबाळ जगवावी कशी, असा सवाल उपस्थित केला तर अधिकाऱ्यांना आमचे हाल बघायला वेळ नाही असे म्हटले. इथं मुबलक पाणी, आरोग्य आणि शिक्षणविषयक सुविधाही नाहीत, अशी ओरड येथील ग्रामस्थांनी केली. लवकरात लवकर शासनाने उपाययोजना करावी, अशी मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे.

---

# दागिन्यांची पर्स लांबवली

**। पनवेल । वार्ताहर ।**

अलिबाग ते पनवेल बसमधून पनवेल बस थांब्यावर उतरत असताना ५५ वर्षीय महिलेकडील लहान पर्समध्ये ठेवलेले दागिने चोरट्याने चोरून नेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कल्पना महेंद्र पाटील ह्या वडवली, ताडवागळे येथे राहतात. त्या पोयनाड बस थांबा येथून अलिबाग ते पनवेल बसने ठाणगेवाडी, कल्याण येथे जात होत्या. सदरची बस पावणेचार वाजता पनवेल बस स्टॉप येथे थांबली. यावेळी प्रवाशांची गर्दी होती. त्या खाली उतरून पनवेल येथील बिकानेर स्वीट मार्ट येथे खाऊ घेत असताना पैसे काढू लागल्या. यावेळी त्यांना मोठ्या पर्समधील सोन्याचे दागिने ठेवलेली सफेद रंगाची लहान पर्स दिसून आली नाही. यावेळी पर्स आतमध्ये असेल म्हणून त्यांनी शोधाशोध केली नाही. त्यानंतर त्या बहिणीकडे गेले असता त्यांनी पर्स तपासून पाहिली. यावेळी लहान पर्समध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने सापडून आले नाहीत. पनवेल बस स्टॉप येथे उतरताना चोराने सहा लाख तीस हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

---

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग**
**पिनकोड- ४०२ २०१**

ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दूरध्वनी/फॅक्स क्रमांक :- (०२१४१) २२२०८४/२२५०९६

**ई-निविदा सूचना क्र. ७ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | वरसोली थळ चाळमळा रस्ता प्र.जि.मा. ३७ कि.मी. 0/00 ते ६/000 ची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. ता. अलिबाग, जि. रायगड | १६0३३४७.00 |
| २ | आवास सासवणे रस्ता प्र.जि.मा. ३६ कि.मी. 0/000 ते ६/000 ची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे ता. अलिबाग, जि. रायगड | १८५६५१0.00 |
| ३ | चौल चौकी ते रेवदंडा एस.टी. स्टँड प्रजिमा २८ किमी 0/000 ते २/९00 ची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे ता. अलिबाग, जि. रायगड | १११८३५३.00 |
| ४ | उद्धर कुंभारघर महागाव चंदरगाव हातोंड गोंदाव ते रा.म.मा. ५४८ (अ) रस्ता प्रजिमा ४0 कि.मी. 0/00 ते ३४/४00 ची वार्षीक देखभाल व दुरूस्ती करणे, ता. सुधागड, जि. रायगड | १0१५५४५.00 |
| ५ | मुरूड एकदरा राजपुरी रस्ता प्र.जि.मा.-५५ कि.मी. 0/000 ते ६/४४0 ची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे ता. पेण, जि. रायगड | १३५९९३३.00 |
| ६ | सावरोली खारपाडा रा.मा. १0४ कि.मी. १९/८00 ते २९/00 या रस्त्याची देखभाल व दुरूस्ती करणे ता. पेण, जि. रायगड | १७६७२६८.00 |
| ७ | निगडे पाबळ कोंडवी रस्ता प्र.जि.मा. २४ कि.मी. 0/00 ते २६/६00 या रस्त्याची देखभाल व दुरूस्ती करणे ता. पेण, जि. रायगड | १८९0८0४.00 |
| ८ | हमरापूर दादर रस्ता प्र.जि.मा. २७ कि.मी. 0/00 ते १३/३00 या रस्त्याची देखभाल दुरूस्ती करणे, ता. पेण, जि. रायगड | १७५७९१६.00 |
| ९ | वाशी वढाव काळेश्री रस्ता प्र.जि.मा. २३ कि.मी. 0/00 ते ८/४५0 या रस्त्याची देखभाल व दुरूस्ती करणे ता. पेण, जि. रायगड | १८२0१५६.00 |
| १0 | वाक्रुळ वरवणे तिलोरे रस्ता प्र.जि.मा. २६ कि.मी. 0/00 ते ८/५00 या रस्त्याची देखभाल व दुरूस्ती करणे ता.पेण. जि. रायगड | १५६७९९७.00 |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक १९.०७.२०२४ (स.१०.००) ते दिनांक २६.०७.२०२४ (सं. १८.००)
ई-निविदा उघडणे :- दिनांक २९.०७.२०२४ (दु.३.०० वा.)
(कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांचे कार्यालयात)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http:/mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./सा.बां./अवि/निविदा/३७०९/२०२४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, अलिबाग-४०२ २०१
दिनांक : १२/०७/२०२४

सही/-
**(ज.ई. सुखदेवे)**
कार्यकारी अभियंता,
सा.बां. विभाग, अलिबाग,
जि. रायगड

# पेण तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न साकार करणार...

# उच्च शिक्षित आर्किटेक्ट अतुल म्हात्रे



**छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मराठी आरमाराची भूमी असलेल्या 'दादर' गावाला इतिहास आहे. अशा ऐतिहासिक गावात जन्म झालेल्या अतुल नंदकुमार म्हात्रे यांनी अतिशय प्रतिकुल परिस्थितीवर मात करून स्वयंस्फूर्तीने स्वत:च स्वत:चे शिक्षक होवून आर्किटेक्ट या क्षेत्रातील मास्टर ऑफ आर्किटेक्ट हे तेजस्वी उच्च सर्वोत्तम शिक्षण लंडन येथे घेतले आहे. आपल्या शिक्षणाचा, ज्ञानाचा उपयोग समाजासाठी, भूमिपुत्रांना सुखी करण्यासाठी झाला पाहिजे अशी सामाजिक बांधिलकीची भावना जोपासणारे अतुल म्हात्रे यांनी पेण तालुक्याचा सर्वांगिण विकास करण्याचा निर्धार केला आहे.**



सुधाकर लाड, ज्येष्ठ पत्रकार, इतिहास संशोधक
९२२४२३२९६३

'शिक्षणाच्या सर्व शाखांमध्ये ' तेजस्वी'असे सर्वोत्तम शिक्षण कोणते असेल तर ते स्वत:च स्वत:ला दिलेले शिक्षण होय.' या सुविचारात स्वावलंबनाचे सर्वोच्च सुंदर तत्व साठवलेले आहे. स्वयंस्फूर्तीने मिळवलेले ज्ञान आणि निढळाच्या घामाने कमावलेली संपत्ती हीच जन्मभर पुरणारी असतात. असे सर्वोच्च सुंदर सत्य या सुविचारात आहे.

अतुल म्हात्रे यांच्या ' म्हात्रे' या आडनावालाही इतिहास आहे. शिवकाळात खारेपाटातील खाडी किनारी राहणारे 'आगरी' समाजातील लोक खाड्यांतून 'तर' चालवित तरीतून खाड्यांतून प्रवास करीत. जे लोक मोठमोठ्या महातरी चालवित त्यांना महातरे नावाने ओळखले जाई. महातरेचा अपभ्रंश होवून 'म्हात्रे' या आडनावाने महातरी चालविणाऱ्या लोकांना ओळखले जाऊ लागले असा ' म्हात्रे' आडनावाला इतिहास आहे.

पेण तालुक्यातील 'दादर' या गावाचे रहिवासी असलेले नंदकुमार हरिश्चंद्र म्हात्रे यांचे सुपुत्र अतुल म्हात्रे यांचे प्राथमिक शिक्षण नवीन पनवेलमधील साईबाबा प्राथमिक मराठी विद्यालयात झाले. याच विद्यालयात इयत्ता चौथीमध्य शिकत असताना स्कॉलरशिप परीक्षेत अतुल म्हात्रे यांनी रायगड जिल्ह्यात दुसरा क्रमांक मिळवला होता.

अतुल यांचे वडील नंदकुमार आणि आई सौभाग्यवती नमिता यांनी त्यांच्यावर सुसंस्कार करीत त्यांच्या बालमनात शिक्षणाची आवड निर्माण केली होती. सामाजिक आणि राजकीयदृष्टया दादर हे काहीसे उपेक्षीत गांव असले तरी दादर हे गाव शिक्षणाचे माहेरघर आहे. दादर गावातून आजपर्यंत डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, शिक्षक, वकील, ग्रामसेवक, तलाठी झाले आहेत. एवढेच नव्हे तर एमपीएससी, यूपीएससी स्पर्धा परीक्षेत अनेक तरूण उत्तीर्ण झाले आहेत.

अतुल म्हात्रे यांचे आजोबा हरिश्चंद्र लक्ष्मण म्हात्रे हे शिक्षक होते. त्यांनी त्यांच्या मुलांनीही शिक्षण घ्यावे, शिक्षित व्हावे यासाठी अहोरात्र मेहनत घेतली होती. त्यांचे वडील नंदकुमार सिव्हील इंजिनिअर पदावर रायगड जिल्हा परिषदेत कार्यरत होते. नंदकुमार यांना अपेक्षेप्रमाणे उच्च शिक्षण घेता आले नाही. त्यामुळे त्यांनी जिल्हा परिषदेत प्रामाणिकपणे नोकरी करीत असताना त्यांचे उच्च शिक्षण घेण्याचे अपूर्ण राहिलेले स्वप्न त्यांच्या मुलात त्यांनी पाहिले होते.

अतुल याने मास्टर ऑफ आर्किटेक्टचे उच्च शिक्षण परदेशात जाऊन घ्यावे यासाठी त्यांनी अतुल लहान असतानाच त्याचा शैक्षणिक पाया मजबूत केला होता. अतुल म्हात्रे महात्मा इंग्लीश मिडीयम स्कुलमध्ये शिकत असताना अतुल म्हात्रे यांना त्याच्या शिक्षकांकडून एक स्कॉलर मुलगा, एक हुशार मुलगा म्हणून नेहमी प्रोत्साहन मिळालं होतं.

डोंबाळा येथील महात्मा जोतिबा फुले आर्टस् आणि सायन्स् महाविद्यालयात बारावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर अतुल म्हात्रे यांनी बॅचलर ऑफ आर्किटेक्चर पदवीसाठी प्रभादेवी (मुंबई) येथील रचना संसद या अकॅडमीत प्रवेश घेतला. या ॲकॅडमीत इंटरन्स परीक्षेत पहिल्या चाळीस मुलांत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यामुळे अतुल म्हात्रे यांना अकॅडमीच्या फीमध्ये सुट मिळाली. त्यामुळे या अकॅडमीत शिक्षण घेणे अतुल म्हात्रे यांना शक्य झालं.

अतुल म्हात्रे यांचे वडील रायगड जिल्हा परिषदेत नोकरी करीत होते. कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी अतुल यांची आई घरी शिवणकाम करून संसाराला हातभार लावत होती. अशा एकंदर परिस्थितीत सर्वसामान्य कुटुंबातील अतुल म्हात्रे यांनी मात्र परदेशात जाऊन आर्किटेक्टमधील मास्टर ही उच्च पदवी मि ळवायचीच असं ध्येय, स्वप्न उराशी बाळगलं होतं.

आत्मविश्वास आणि महत्वाकांक्षा हे गुण जन्मत:च अंगी असलेल्या अतुल म्हात्रे यांनी उच्च शिक्षण घेण्याचे ध्येय, स्वप्न साकार करण्यासाठी अभ्यास करण्याचे व्यसन स्वत:ला लावले होते.

रचना संसद ॲकॅडमीत शिक्षण घेत असताना आपल्या ज्ञानाच्या स्रोतात भर व्हावी म्हणून अतुल म्हात्रे अभ्यासाबरोबरच वेगवेगळ्या वर्कशॉपला उपस्थित रहात असत. टाटा सोशल रिसर्च सेंटर, सीटी रिसर्च एनिशेटीव्ह ट्रस्ट (सीआरआयटी) या संस्थांतून माहिती घेत असत, आंतरराष्ट्रीय दर्जाची पुस्तके वाचत असत.

जगात काही तरी श्रेष्ठ कार्य करणे अशी ज्यांची महत्वाकांक्षा आहे. अशांच्या सावलीला उभे राहिले म्हणजे आपल्यालाही चांगले कार्य करता येते या विचाराने अतुल म्हात्रे यांनी मुंबईतील प्रसिध्द आर्किटेक्ट नीरा अडारकर, विजय तेंडूलकर यांच्या हाताखाली काम केले. अतुल म्हात्रे यांचे आई, वडीलही मुलांनी शिक्षण घ्यावं म्हणून खुप कष्ट करीत होते. याच दरम्यान अतुल म्हात्रे यांनी आयईएलटीएसची परीक्षा दिली. या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर अतुल म्हात्रे यांचे आर्किटेक्चरचे परदेशात जाऊन शिक्षण घेण्याच्या ध्येयाचा, स्वप्नाचा मार्ग मोकळा झाला. जगातील एक नंबर असलेल्या नामांकित अशा इंग्लंड देशातील लंडन येथील 'असोसिएशन स्कुल ऑफ आर्किटेक्चर' या महाविद्यालयामध्ये अतुल म्हात्रे यांना प्रवेश मिळाला. याच महाविद्यालयाच्या बाजुला असलेल्या युनिव्हर्सिटीत भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे एक शिल्पकार महात्मा गांधी यांनी बॅरिस्टरचे शिक्षण घेतले होते. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बॅरिस्टरचे शिक्षण घेतले होते. याच युनिव्हर्सिटीत कुलाबा जिल्ह्याचे माजी खासदार बॅरिस्टर ए.टी. पाटील, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कोकणाचे भाग्यविधाते अब्दुल रहेमान अंतुले यांनी बॅरिस्टरचे शिक्षण घेतले होते.

जगप्रसिध्द पीएचडी सेंटर लंडनमध्ये आहे. स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स (लंडन) मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण घेतलं होतं. या परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य पुतळा उभारला आहे.

भारताच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाला ज्या महामानवांनी यशस्वी केलं त्या महामानवांनी ज्या महाविद्यालयात शिक्षण घेतलं त्या महाविद्यालयात शिकण्याची संधी अतुल म्हात्रे यांना मिळाली होती. या संधीचा सदुपयोग करीत अतुल म्हात्रे यांनी आनंदाने, उत्साहाने परिश्रमाची पराकाष्टा करून आर्किटेक्चरमधील 'मास्टर' ही उच्च पदवी मिळवली आणि त्यानंतर जगातील सर्वात उत्कृष्ट आर्किटेक्ट असलेल्या 'जहाहदीद' यांच्या कार्यालयात अतुल म्हात्रे त्यांना काम करण्याची नोकरी करण्याची संनी मिळाली. जागतिक किर्तीच्या सर्वोत्कृष्ट इमारतींची आर्किटेक्चर ड्रॉईंग याच कार्यालयात तयार करण्यात आल्या. नवी मुंबई येथे तयार होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचे आर्किटेक्चर ड्रॉईंग याच कार्यालयात तयार करण्यात आले. अतुल म्हात्रे यांनी या कार्यालयात काम करताना स्वयंस्फूर्तीने आर्किटेक्चरमधील सर्वोत्तम ज्ञान प्राप्त केले. आर्किटेक्चरच्या कामात ते एकरूप झाले होते. अतुल म्हात्रे यांचे दिवस आनंदात चालले होते.

याच काळात २००८ साली पाकिस्तानी अतिरेक्यांनी मुंबईवर हल्ला केला. या हल्ल्यात असंख्य मुंबईकर नागरिक, पोलीस, परदेशी पर्यटक धारातिर्थी पडले. या घटनेने अतुल म्हात्रे यांच्या संवेदनशील मनाला कुठेतरी खोल जखम झाली. ही घटना आर्किटेक्ट अतुल म्हात्रे यांच्या जीवनाला कलाटणी देणारी ठरली.

लंडनसारख्या शहरात जागतिक किर्तीच्या आर्किटेक्ट कार्यालयात (कंपनीत) मोठे पॅकेज असलेली नोकरी सोडून भारतात स्वदेशात परतण्याचा निर्णय अतुल म्हात्रे यांनी घेतला. स्वदेशात आल्यावर स्वत:च्या उध्दाराचे सामर्थ्य स्वत:च्याच हातात असते. या विचारांनी प्रेरीत होऊन अतुल म्हात्रे यांनी आई, वडीलांचा सल्ला घेऊन, आशिर्वाद घेऊन स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. सुरूवातीला त्यांच्यासमोर अनेक संकटे उभी राहिली पण दिव्याला अंधारात वाट मिळते तशी ध्येयनिष्ठ अतुल म्हात्रे यांना सर्व संकटांनी वाट करून दिली. स्वकर्तृत्वसिध्द करण्यासाठी अतुल म्हात्रे यांनी नवी मुंबईतील बेलापूर येथे DEVISE या नावाने स्वत:ची आर्किटेक्ट फर्म सुरू केली.

या फर्मच्या माध्यमातून सुरूवात करताना अतुल म्हात्रे यांनी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, पनवेल महानगरपालिका, एम.एस. आर.डी.सी, रायगड जिल्हाधिकारी, ठाणे जिल्हाधिकारी, एम.आय.डी.सी. या प्राधिकरणांसोबत विशेष अभ्यासपूर्वक काम करण्यास सुरूवात केली. याच काळात अतुल म्हात्रे यांनी महाराष्ट्र शासनाच्या वेगवेगळ्या विकास कामांच्या आराखड्यांचा अभ्यास केला. अनेक ठिकाणी जाऊन वर्कशॉप अटेंड केले. पुस्तके वाचली, माहिती गोळा केली.

दरम्यानच्या काळात पनवेल, उरण, कर्जत, पेण, खालापूर या तालुक्यांमध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे सिडको, नैना, सेज, एमआयडीसी, गेल पाईप लाईन, एमएसआरडीसी, एमएमआरडीए या प्राधिकरणांद्वारे नवीन विकास आराखडे, विकासनियमन नियमावली बनविण्यात आली ज्यांचा स्थानिक शेतकरी, भूमिपुत्र, जमीन मालक यांच्या जीवनावर मोठा विपरीत आणि वाईट परिणाम होणार होता, याची कल्पना, जाणीव अतुल म्हात्रे यांना त्यांनी केलेल्या अभ्यासामुळे झाली. या विकास नियम व नियमावलीचा अभ्यास करून त्यावर सुयोग्य भाष्य करून अतुल म्हात्रे यांनी शेतकऱ्यांचे भूमिपुत्रांचे प्रबोधन केले. तसेच या सर्व प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसमोर विकास आराखड्यातील धोरणाबाबत सुयोग्य भाष्य करून सुयोग्य बदल अतुल म्हात्रे यांनी वारंवार मांडले. लोकप्रतिनिधींच्या माध्यम ातून काही प्रस्ताव महाराष्ट्र शासनाला अतुल म्हात्रे यांनी दिले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या विकास आराखड्यातील त्रुटी लोकप्रतिनिधींच्याद्वारे अधिवेशनाच्या काळात राज्याचे सर्वोच्च सभागृह असलेल्या विधी मंडळात मांडण्याचे यशस्वी प्रयत्न अतुल म्हात्रे यांनी केले आहेत.

भारताची आर्थिक राजधानी असलेल्या म ुंबईसारख्या शहरात लोकांना निवासासाठी जागा कमी पडू लागल्यामुळे महाराष्ट्र शासनाने रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील समुद्र, खाड्या किनारपट्टीच्या भागात सिडकोसारखा प्रकल्प लादला. आणि इथल्या शेतकऱ्यांना भूमिहीन करण्यात आले त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात आला.

सिडकोने या भागात विकास केला, नवीन सुसज्ज शहरे वसवली. भारताच्या कानाकोपऱ्यांतून या भागात मोठ्या संख्येने परप्रांतिय वास्तव्य करण्यासाठी आले परंतु इथला मूलनिवासी,भूमिपुत्र मात्र भूमिहीन झाला. उद्ध्वस्त झाला. त्याच्या अपेक्षांचा भंग झाला. त्यांना पायाभूत सेवा सुविधा उपलब्ध करून न दिल्यामुळे असंख्य समस्यांना सामोरे जाण्यासाठी भूमिपुत्र, शेतकरी आज रस्त्यावर उतरून आंदोलन करीत आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १० जानेवारी, २०१३ रोजी एक अधिसुचना प्रसिध्द केली. विकास नियमावली जाहीर केली. परंतु आंतरराष्ट्रीय विमानतळाची निर्मिती होत असताना विकास नियमावलीचा अवलंब केल्यामुळे नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या चारी बाजुला झोपडपट्टीचा विळखा बसला अशा परिस्थितीत नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाची निर्मिती करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई 'इंटरनॅशनल एअरपोर्ट नॉटीफाय एरिया'(नैना) या नावाचे एक सक्षम प्राधिकरण (प्रकल्प) स्थापन केले. अतुल म्हात्रे यांनी नैना प्रकल्पाचा अभ्यास केल्यानंतर हा प्रकल्प संपूर्ण ग्रामीण जीवन उद्ध्वस्त करणारा, भूमिपुत्रांना उद्ध्वस्त करणारा प्रकल्प असल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकल्पात गावकी, भावकी, नाती, गोती, भूमिपुत्रांच्या वाडवडिलांची पिढीजात घरे, दारे, अंगणे, शेती-भाती, विहिरी, तलावे, डोंगर, टेकड्या, गुरे-ढोरे, देव-देवळे, आंबे, जांभूळ, वड-पिंपळ इत्यादी झाडे-वेली नष्ट करणारा हा प्रकल्प आहे, याची खात्री पटल्याने अतुल म्हात्रे यांनी या प्रकल्पाच्या महासंकटातून भूमिपुत्रांना वाचविण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार मनोमन केला.

बहुजन समाजाविषयी आस्था असल्यामुळे सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून आपण घेतलेल्या शिक्षणाचा, अभ्यासाचा, ज्ञानाचा उपयोग समाजासाठी इथल्या भूमिपुत्रांना सुखी करण्यासाठी करण्याचा संकल्प अतुल म्हात्रे यांनी केला आहे. लंडन सारख्या अत्याधुनिक शहराच्या धर्तीवर या भागाचा विकास झाल्यास या भागातील शेतकरी, भूमिपुत्र सुखी होतील अशी विकास प्रणाली राबविण्यासाठी अतुल म्हात्रे यांचे प्रयत्न सुरू आहेत.

अखिल भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील, माजी आमदार बाळाराम पाटील, माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांचे मार्गदर्शन, सहकार्य अतुल म्हात्रे यांना मिळत आहे. सिडको, नैना, सेज, एमआयडीसी, गेल पाईपलाअईन प्रकल्प बाधित क्षेत्रातील शेतकऱ्यांचा, भूमिपुत्रांचाही अतुल म्हात्रे यांना पाठिंबा मिळत आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अलिबाग-विरार मल्टीमॉडेल कॉरीडॉर, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (अटल सेतु) या प्रकल्पांचा विकास होत असताना पनवेल, उरण, पेण, कर्जत, खालापूर या तालुक्यांमध्ये होऊ घातलेल्या तिसऱ्या मुंबईचा विकास हा पूर्वी झालेल्या नवी मुंबईच्या विकासापेक्षा वेगळा असावा. तिसऱ्या मुंबईचा विकास होत असताना नवीन विकास आराखडे, नवीन विकास धोरणे बनवित असताना शेतकरी, भूमिपुत्र केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे किंबहुना या भागात होणाऱ्या विकासाचा विकासक स्वत: या भागातील शेतकरी, भूमिपुत्र हाच असायला हवा. अशी ठामपणे स्पष्ट भूमिका अतुल म्हात्रे सिडको, नैना प्रशासनासमोर, एमएमआरडी, एमएसआरडीसी या प्राधिकरणांसमोर भूमिपुत्रासमोर, अभ्यासकांसमोर, लोकप्रतिनिधींसमोर सातत्याने प्रेझेंटेशन देवून मांडत आले आहेत.

आजचा भूमिपुत्र हा सुशिक्षित आहे, सक्षम आहे. तोच या विकासाचा निर्माता असला पाहिजे. येत्या पाच वर्षांमध्ये तिसऱ्या मुंबईतील किमान निम्म्याहून अधिक गावांमध्ये प्रत्येक गावांतून पाच भूमिपुत्र विकसक निर्माण झाले पाहिजेत म्हणजेच येत्या पाच वर्षांत वर्षाला किमान एक हजार भूमिपुत्र विकसक निर्माण करण्याचा संकल्प आर्किटेक्ट अतुल म्हात्रे यांनी केला आहे. त्यासाठी लागणारे सुयोग्य व्यवस्थापन, नियोजन, मार्गदर्शन यांची संपूर्ण यंत्रणा आर्किटेक्ट अतुल म्हात्रे यांच्याकडे उपलब्ध आहे. जर भूमिपुत्र शेतकऱ्यांकडे स्वत:ची विकासक्षम शेतजमीन असेल अथवा नसेल स्वत:चे प्राथमिक भांडवल असेल अथवा नसेल पण जर इच्छाशक्ती असेल, काम करण्याची क्षमता असेल तर त्या भूमिपुत्राला विकसक बनविल्याखेरीज राहणार नाही असा आत्मनिर्धार महत्वाकांक्षी आर्किटेक्ट अतुल म्हात्रे यांनी केला आहे.

पनवेल तालुक्यातील महानगरपालिका क्षेत्रातील पेठाली गावातील केणी बंधूंनी एकत्र येवून स्वत:च्या पिसार्वे गावातील शेतजमिनीचा विकास करण्याचा संकल्प केला आहे. हा विकास आर्किटेक्ट अतुल म्हात्रे यांच्या कल्पनेतून 'केणीसिटी' या नावाने हा गृह व्यावसायिक असा भव्य प्रकल्प साकार होत आहे. हा गृह-व्यावसायिक भव्य प्रकल्प कल्पनेतून सत्यापर्यंत उतरविण्यासाठी प्रत्येक स्तरावर आर्किटेक्ट अतुल म्हात्रे मदत करीत आहेत. टेंभोडे येथील महाऊर्जा प्रकल्पातून शेतकऱ्यांच्या जमिनीतून टॉवर जाऊन शेतकऱ्यांना अल्प मोबदला मिळत होता. त्यासाठी संघर्ष करून मुंबई ऊर्जा कंपनीकडून वळवली, नेवाळी व पनवेल तालुक्यातील इतर गावांना करोडो रूपयांचा मोबदला शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी अतुल म्हात्रे यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

६ डिसेंबर ते १५ डिसेंबर २०२३ ला तुरमाळे येथे नैना बाधीत शेतकऱ्यांनी 'नैना हटाव' चा (पान ७ वर)



# पैशांची 'लाडकी' फेकाफेक

दरवर्षी एक ऑगस्टला लोकमान्य टिळकांचे स्मरण केले जाते. पण यंदा त्यांची आठवण पंधरा दिवस आधीच काढावी लागते आहे. लोकमान्यांनी, सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय असा सवाल ब्रिटीश सरकारला केला होता. आज तोच सवाल, वेगळ्या संदर्भात, महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे सरकारला विचारावा लागत आहे. राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे असेही टिळकांनी लिहिले होते. हा इशारा केंद्रातील मोदी व राज्यातील फडणवीसांच्या नेतृत्वाला आजही लागू आहे. पण लोकमान्यांच्या मूळ वाक्यात बदल करून, राज्य करणे म्हणजे निव्वळ पैसे वाटणे नव्हे असे शिंदे यांना बजावण्याचीही वेळ आली आहे. राज्याचा अर्थसंकल्प मांडण्यापासून या सरकारने योजनांची आणि पैशांची जी फेकाफेक चालवली आहे तिचा समाचार आम्ही या स्तंभातून यापूर्वीही घेतला आहे. निवडणुका जवळ येतील तसतसे सरकार अधिकाधिक फेकूगिरी करू लागेल असे भाकितही आम्ही केले होते. शिंदे आणि मंडळी ते खरे करून दाखवत आहेत. लाडकी बहीण योजनेच्या पाठोपाठ आता शिंदे कंपनीने लाडका भाऊ योजना काढली आहे. मुळात यातील लाडका आणि लाडकी या शब्दांनाही आक्षेप घ्यायला हवा. सरकारसाठी सर्व नागरिक समान असायला हवेत. आता या योजनांमध्ये ज्यांचा नंबर लागेल ते सर्व लाडके आणि ज्यांना काही कारणामुळे लाभ मिळणार नाही ते सर्व सरकारचे दोडके असे म्हणायचे का? पण आजच्या काळात इतक्या ताळतंत्राची अपेक्षा सत्तेसाठी वाटेल त्या थराला जाणाऱ्यांकडून करणे गैर आहे. त्यामुळे हा शब्दाचा मुद्दा जरी बाजूला ठेवला तरी या योजनांचे स्वरुपच आक्षेपार्ह आहे. लाडकी बहीण योजना ही योजना गरीब महिलांना उपयोगी आहे असे म्हणून तिचे स्वागत करता येईल. पण लाडका भाऊ या योजनेमध्ये अनेक गडबडी आहेत. निव्वळ प्रसिध्दीसाठी अत्यंत घाईघाईने तिची घोषणा करण्यात आली आहे.

## मतांसाठी खटाटोप

बारावी, आयटीआय व पदवीधर मुलांना सहा महिन्यांसाठी कंपन्या व उद्योगांमध्ये नोकऱ्यांचा अनुभव घेता येईल व त्या काळात सरकार त्यांना सहा, आठ व दहा हजार रुपये प्रतिमहिना विद्यावेतन देईल. यासाठी वर्षाला सुमारे दहा हजार कोटी रुपये खर्च येईल असा प्राथमिक अंदाज आहे. मुलांना अनुभवासाठी आपल्याकडे नोकऱ्या देणाऱ्या कंपन्या सरकारच्या कौशल्य विकास कार्यक्रमात नोंदलेल्या असतील. वरवर पाहता योजना ठीक आहे. मात्र तिची अंमलबजावणी खरेच होणार का व कशा रीतीने होणार हे खोलात जाऊन पाहायला हवे. मुळात आपल्याकडची शिक्षणव्यवस्था इतकी रद्दी आहे की, बारावी किंवा पदवी घेतलेलेच नव्हे तर इंजिनिअरिंग शिकलेल्यांचाही प्रत्यक्ष कारखान्यांमध्ये वा कंपन्यांमध्ये काहीही उपयोग नसतो हा नेहमीचा अनुभव आहे. सरकारच्या आधीपासून अशा काही योजना अस्तित्वात आहेत. त्यांच्या अंमलबजावणीतही यामुळेच अडचणी येतात. तरीही काही कंपन्या याचा फायदा घेतात. मात्र त्यात उमेदवारांना खरोखर किती प्रशिक्षण व फायदा मिळतो आणि पुढे जाऊन त्याचा काय लाभ होतो हे गुलदस्त्यात आहे. दुसरे म्हणजे, सर्वसाधारणपणे सरकारकडून अशा प्रकारचे कोणतेही विद्यावेतन, शिष्यवृत्ती किंवा अनुदान मिळवणे हे भीक नको पण कुत्रा आवर अशा प्रकारचे असते. चौथी आणि सातवीच्या शालेय शिष्यवृत्तीचे किरकोळ म्हणावेत असे पैसे किंवा शेततळ्यांसाठीचे अनुदान किती थकलेले आहे याची आकडेवारी पाहण्यासारखी आहे. एक मात्र खरे की, सत्तारुढ पक्षाचे आमदार व नेत्यांच्या मर्जीतील कार्यकर्ते अशा योजनांचा लाभ उठवण्यात माहीर असतात. कधी ते दलाल म्हणून या योजनेतून कमिशन घेतात किंवा कधी आपल्या आजूबाजूच्यांना उपकृत करण्यासाठी त्याचा वापर होतो. किंबहुना, विधानसभेच्या निवडणुका दोन महिन्यांवर येऊन ठेपल्या असल्यामुळेच हा सर्व खटाटोप चालला आहे. कार्यकर्त्यांना कामाला लावण्यासाठी व त्यांच्या पैशा-पाण्याची सोय करण्यासाठी अशा योजनांचा वापर होऊ शकतो.

## धोरण हवे

तरुण मुलांना कौशल्ये शिकवण्यासाठी सरकार पुढाकार घेत असेल तर ते चांगले व आजच्या काळात महत्वाचेच आहे. मात्र निवडणुकीच्या तोंडावर सोईस्कर पैसेवाटप करण्याने हा उद्देश साध्य होणार नाही. त्यासाठी सरकारला व्यापक औद्योगिक धोरण ठरवावे व जाहीर करावे लागेल. महाराष्ट्रातील उद्योग-धंद्यांची स्थिती काय आहे, त्यांची गरज काय आहे याचा समग्र आढावा त्यासाठी घ्यावा लागेल. आपल्या शिक्षणपध्दतीत काही गोष्टी समाविष्ट कराव्या लागतील. त्यामुळे मुलांची कौशल्ये शिकता-शिकताच विकसित होतील. नंतर मग अशा विद्यावेतनाच्या योजना सुरू केल्या तर त्यांचा सर्वांनाच फायदा होईल. आज आयटी क्षेत्राच्या वाढत्या प्रभावामुळे दोनच प्रकारच्या तरुणांना विशेष संधी आहे. ज्यांनी इंजिनिअरिंगमध्ये उच्च शिक्षण घेतले आहे त्यांना किंवा मग अमेझॉन, झोमॅटो किंवा डीमार्टसारख्या ॲपच्या वापरामुळे माल पोचवणे वगैरेंसारखी हमाली करण्याची तयारी आहे त्यांना. बाकी अधल्या-मधल्या लोकांना यात काही वाव नाही. आयटीआयमध्ये तांत्रिक कसब शिकलेले, पण तरीही बेकार असे हजारो तरुण येथे आहेत. परवा मुंबईत एअर इंडियातील लोडर किंवा तत्सम हमालीची कामे करणाऱ्या अठराशे जागांची भरती होती. त्यावेळी देशभरातील सुमारे वीस हजार तरुण जमा झाले होते. यामध्ये मास्टर्सची पदवी घेतलेलेही अनेक जण होते. प्रवाशांचे सामान विमानात नेऊन ठेवणे व नंतर विमानातून आणणे हे मुख्यतः या लोकांचे काम असते. या कामासाठी पगारही सुमारे वीस हजार रुपयांच्या आसपास असतो. हे अत्यंत कष्टाचे व वेळेचे बंधन नसलेले काम असते. तरीही त्यासाठी तरुणांची इतकी झुंबड उडावी हे आपल्याकडच्या बेकारीचे विदारक दर्शन घडवणारे चित्र आहे. या स्थितीत तरुणाईचा योग्य विकास घडावा आणि अर्थव्यवस्थेलाही फायदा व्हावा अशी धोरणे आखली जाण्याची गरज आहे. शिंदे सरकारच्या योजनांमागे तशी दृष्टी दिसत नाही. या ना त्या मार्गाने लोकांवर पैसे फेकावेत आणि निवडणुका जिंकाव्यात इतकाच उददेश त्यामागे आहे. यामधून राज्याच्या तिजोरीची वाट लागली तरी त्याची पर्वा त्यांना नाही.

विचार

# पाहिला डाव ऐसा निसर्गाचा, आज... वर्ष झाले

***६ जुलै २००५ चा महापूर स्मृतीत राहून गेला, २०१४ सालची माळीणची दुर्घटना तशीच. अशीच ईर्शाळवाडीची दुर्दशा!***



**संजय जाधव**

गतवर्षी ईर्शाळवाडीची दुर्घटना झाली तेथून असा एकही दिवस गेला नाही, की ईर्शाळवाडीच्या डोंगर इलाख्यावर नजर गेलीच नाही. अर्थात मुंबई-पुणे हमरस्त्यालगत मौजे चौक या ठिकाणी निवास असल्याकारणाने जाता येता ईर्शाळवाडीचा डोंगर दर्शनीय आहे. या डोंगरक्षेत्राच्या पाठमोरचा भाग म्हणजे माथेरानचे विश्व! सकाळपासून सांजेपर्यंत हे विश्व संवेदनशील मनांना खुणावत असते.

या हमरस्त्यावरून दुतर्फा गाड्यांची धावपट्टी चालू असते. मध्यरात्रीच्या वेळीच ही धावपट्टी मंद होते. येथेच गेल्यावर्षी कडा कोसळला होता. माणसं मातीआड गेली. याची आठवण करून देताना दिसतात.

मृत्यू अटळच असतो, हो! मात्र, असे मरण... बेसावधतेचे गतप्राण, कोणासही साद न देता, कोणाचेही मुख न पाहता निर्जीव होणे. या तऱ्हेला काय म्हणावे? नैसर्गिक आपत्ती आपण म्हणतो त्यातलीच नैसर्गिक आपत्ती ईर्शाळवाडीवर कोसळली, होत्याचे नव्हते झाले. आज एक वर्ष झाले त्या दुर्दशेला! विनाशकाळाला !

१९ जुलै २०२३ दिवस उजाडला. वाऱ्याच्या वेगाने वणव्यासारखी एक बातमी प्रत्येक रहिवाशापर्यंत पोहचली. डिजीटल प्रसार माध्यमांद्वारे जगभर प्रसारित झाली- ईर्शाळवाडीवर दरड कोसळली.

पहिल्या दिवशी सदर प्रकरणाची गंभीरता लोकमानसापर्यंत गेली नव्हती. सामान्यतः परिस्थिती रूळावर येईल. या विचाराने बऱ्याच जणांनी ईर्शाळवाडीकडे जाण्याचे मनावर घेतले नाही. मात्र, दुसऱ्या दिवशी म्हणजेच २० जुलै २०२३ रोजी लोकांची पाऊले तिकडे जाऊ लागली.

याच दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे मी वाचनालयाच्या भेटीला जात असताना हायवेरोडच्या किनाऱ्याला गाड्यांच्या रांगाच रांगा दिसल्या. थांबलेल्या पोलीस व्हॅनला ओव्हरटेक करून माझ्या समोरून येणाऱ्या एकाला विचारले - 'इतनी ट्रॅफिक क्यूँ है भाई? आगे कुछ हुआ है क्या?' तो म्हणाला, 'आगे बडा ॲक्सिडंट हुआ है।'

या फाट्यापर्यंत येता येता दुर्घटनेचा सारांश समजला. गुरे ढोरे, शेळी मेंढ्या, कोंबड्या बकऱ्या नि डोंगरची माणसे डोंगरच्या मातीनं खाल्ली. ईर्शाळवाडीकडे जाणाऱ्या त्या फाट्याजवळ बराच वेळ उभा होतो. विचारांचं पवनचक्र फिरत होतं. शेवटी निर्णय पक्का केला. पाय वळाले ईर्शाळवाडीकडे! पत्र्याच्या शेडखाली अनेक जण उभे होते, पोलीस होते, मिडीया होती. आपत्कालीन मदत पथके, अन्नदाते, सेवाभावी संस्था, वार्ताहर असे विविध घटकांचे जत्थे ये-जा करीत होते. दुर्घटनास्थळावरून खाली येणारे तेवढेच आणि खालून वरती जाणारे लोक तेवढेच. मीसुद्धा जाणाऱ्यांच्यात सामील झालो. पाऊण तासानंतर एक क्षेत्र असे लागले की, ते 'डंपिंग ग्राऊंड' होते. ग्रामपंचायतीची घंटा गाडी याच ठिकाणी कचरा आणते. असे हे क्षेत्र 'याची डोळा' पाहण्यात आले.

या डंपिंग ग्राऊंडपासून पाऊण घंटा पुढे गेलो. थोडेसे हायसे वाटले; कारण घरे दिसू लागली होती. ही घरे ईर्शाळवाडीच्या डोंगराच्या पायथ्याशी होती. दुर्घटनेचे ठिकाण येथून आणखी दिड-दोन तास आहे. असे ऐकण्यास मिळत होते.

बरं या पायथ्याशी राहणारे रहिवासी वरील ईर्शाळवासियांचे नातलग होते. येथील एका घरात बरीच माणसे जमलेली होती. नातलग दुःखाच्या आकांताने रडत होते, स्फुंदत होते, गहिवरत होते. चारचौघ समाज जमला होता. मात्र मृतदेह या वस्तीत, या घरात नव्हते. या वस्तीसमोरून मृतदेह, जखमींना तातडीने इस्पितळात नेले जात होते.

या परिसरात वरून येणारे थांबत होते, जनतेच्या प्रतिनिधींना बघायला धडपडत होते तर कोणी वरती जाण्याच्या तयारीत दिसले. या दुर्घटनेच्या परिस्थितीत कार्यपथावर असणाऱ्या प्रशासकीय कर्मचाऱ्यांना चहा, कांदा-पोहे, नाश्ताची व्यवस्था दिसत होती.

पाऊल पुढचे पडू लागताच चालीची गती अगदी धिम्म्या गतीने; पण दबक्या परिमाणाने करावी लागली; कारण तांबड्या चिखलाने सीमारेषाच आखली होती. नैसर्गिक आपत्तीचे रूप जणूतः म्हणत असेल, की वरती यायचं आहे तर या चिखलयुक्त सीमेचं सीमोल्लंघन करा!

पुन्हा दुर्घटनास्थळाहून येणाऱ्या दुसऱ्या फळीला विचारले- 'आणखी किती अंतरावर आहे, ईर्शाळवाडी? यावर ते म्हणाले, 'आता तुम्ही जवळ आलेले आहात. येथून जवळच आहे. पुढची एक चढण चढली, की उजव्या बाजूला वळून गेले की समोरच...'

ही चढण न्यारीच होती. जाताना उजव्या हाताकडे भल्या उंचीचा, मोठ्या जाडीचा, गोलाकार पहाड आणि डाव्या बाजूने दोन फुटाची वाट! या वाटेने पुढे जायचं होतं. जाता जाता डाव्या दिशेने लक्ष वेधून घेतले. तिकडे लक्ष दिले तरी चित्त थाऱ्यावर होते. आपले पाय जमिनीवरच आहेत. याची पक्की खात्री करून घेत होतो.

या सपाटीवर एका महाकाय झाडाची मुळी आडवी होती. जशी काही ही मुळी म्हणजे ईर्शाळवाडीचा उंबरठाच होता. हा उंबरठा ओलांडून ईर्शाळवाडीच्या हद्दीत प्रवेश केला. हद्दीतून जाता जाता आजूबाजूला खडक दगडी, कातळांचे लहान लहान उंचवटे, चौथरे दिसले, राजशेतीचे बांध फुटले होते. गवतावर तांबड्या मातीचे थर विसावले होते. घडलेल्या दुर्घटनेतून बचावलेला एक बैल थंडीने कुडकुडत होता.

जनावरांच्या भावना कशा असतील? मृतांच्या नातेवाईकांना खाली नेले जात होते. मिळालेल्या मृतदेहांची विल्हेवाट लावण्यासाठी तेथेच खड्डे खणले जात होते. एवढ्या सगळ्या दृश्यानंतर समोर दृश्य दिसले ते.. भयाणच! विचित्रच! उद्ध्वस्त, लुप्त, जमीनदोस्त साऱ्या शब्दांचा विस्तीर्ण अर्थ हाच काय? असं स्वतःने स्वतःलाच विचारले.

समीप आलो होतो. काळाने झडप घालून जे क्षेत्र छिन्न-विछीन्न केले होते. त्या क्षेत्री पाय लागले. येथून प्रत्यक्ष दुर्घटनास्थळ डोळ्यात घेत होतो. आजूबाजूला लोकं, मदतनीसांचे पथक इकडे तिकडे पाहणी करताना दिसले. पुढे जाऊन प्रत्यक्ष ईर्शाळवाडीतच गेलो. मात्र, 'ती' ईर्शाळवाडी राहिली नव्हती. घरादारांचे अस्तित्व दरडीखाली गेले होते, माणसांची झाली होती प्रेतं. साक्षीला उरली होती फक्त दोन, तीन घरं. 'जीवन क्षणभंगुर आहे' याची प्रचिती येथेसुद्धा आली. तेथे रोजचं जिणं जगणारी माणसे नव्हती; अपरात्री ईर्शाळवाडीवरील कडा कोसळल्याने त्या अपघातात ती माणसे घरांसह गाडली गेली. दडपली गेली. त्यात त्यांच्या बकऱ्या, कोंबड्या अन् गुरांचा ठावठिकाणासुद्धा गतप्राण झाला होता. जे जे बचावले त्यांना तातडीने खाली दवाखान्यात नेण्यात येत होते. मृतावस्थेत सापडलेल्यांना दफन करण्याचा कार्यक्रम होता. त्यांची अंत्ययात्रा काढणार तशी कशी? उर्वरित रहिवाशांना शोधण्यासाठी युद्धपातळीवर चिखलाचे खोदकाम करताना मदतनीस किंवा तत्सम पथके पाहिली. मातीखाली गेलेल्या जिवंत, जखमी माणसांना फावडे, कुदळ, पिकाव विविध अवजारांचा आवाज गेला असेलसुद्धा! मला वाचवणारी माणसे माझ्या आसपास आहेत; पण त्यांना माझं लोकेशन सापडत नाही? पाणी जवळ आहे; पण पिऊ शकत नाही. अशी त्यांच्या जीवाची निश्चितच घालमेल झाली असेल. 'कोणीतरी वाचवेल, कोणाचा तरी हात, पाय मजला लागेल.' या आशेत ते असतील. मृत्यूच्या दारातलं असलं तडफडीचं, गुदमरण्याचं मरण कोणालाच नको यायला. अगदी दुश्मनालासुद्धा!

नदी, समुद्र कसे कचरा घाण किनाऱ्याकडे लोटतात. असेच या आपत्तीने घरं गडप केली नि एका घराचे लोखंडी पाईप, तीन- चार लाकडी वासे, केबल वायर दूर लोटल्या होत्या. एवढं मात्र अवशेष दिसले. त्यांच्या साक्षीने... मूक श्रद्धांजली वाहिली.

निसर्गनिर्मित आपत्ती येते तेव्हा बहुतांची मने हेलावतात, शासकीय यंत्रणा खडबडून जागी होते. परंतु; जेव्हा मानवनिर्मित जातीयतेच्या विखारी मानसिकतेतून माणसे जीवानिशी जातात तेव्हा अशी दिसत नाही माणसे? मानवनिर्मित 'जाती' चा अंत करण्याच्या कामी ही सगळी रूपं एकवटली तर?

आजकाल

# दिलीप खेडकरांचीही चौकशी व्हायला हवी

**माधव कुलकर्णी**

सध्या सनदी अधिकारी पूजा खेडकर यांचे प्रकरण गाजते आहे. त्यांनी आयएएस होण्यासाठी ज्या काही लब्बाड खेळ केले आहेत ते पाहून सर्वच अवाक झाले आहेत. आज प्रशिक्षणार्थी असताना आपल्या खासगी ऑडी गाडीवर बेकायदेशीरपणे लाल दिवा लावण्याचा उद्दामपणा प्रकार येणाऱ्या काळात त्या काय करु शकतील याची चुणूक दिसते.

हा उद्दामपणा कुठून आला हे समजून घ्यायचे असेल तर त्यांचे पिताश्री दिलीप खेडकर यांची थोडी माहिती जनतेसमोर आली पाहिजे. हे महाशय MPCB मधून RO म्हणून निवृत्त झाले आहेत. २००७ पासून ३ वर्षे कोल्हापूरमध्ये MPCB मध्ये रिजनल ऑफिसर (RO) होते. या दरम्यान याच खेडकरांनी कोल्हापूर मध्ये खूप धुमाकूळ घातला होता. काही महिन्यातच यांनी छोट्या छोट्या कारणांनी अनेक फौंड्रिंजना क्लोजर नोटीसा काढल्या. हे महाशय फॉउंड्रीला Visit ला एकटे जात, ड्राइवर सुद्धा सोबत नेत नसत. MPCB ची जीप स्वतः चालवत खेडकर फॉउंड्री मध्ये पोहचत असत. (क्लास वन अधिकारी असून सुद्धा, खेडकर जिथं जिथं होते तिथं तिथं MPCB मधील फील्ड ऑफिसर, SRO यांना कोणतेच काम करावे लागत नसे).

सर्व फाइल त्यांच्याचकडे असत. Visit झाल्यावर अनेक असलेल्या नसलेल्या त्रुटी प्लेन पेपर वर लिहीत. कोणाला चिमणी लहान आहे, मोठी कर, कोणाला स्करबर वेगळा लाव असे सांगत व





स्वतःच्या Thermovetara या कंपनीचे कार्ड देत व सांगत आठ दिवसात Purchase order काढून पाठवा advance अन्यथा Closure ची कारवाई करू.

याच कंपनीत खेडकरची पत्नी, मेहुणा व पूजा संचालक आहेत. (कागदोपत्री खेडकर व त्याची पत्नी विभक्त आहेत. तसें पत्र पुजा ने UPSE ला दिलेले आहे.)

उद्योजक हैराण होते, जी Stack (चिमणी) १ ते २ लाखात बाजारात उपलब्ध होते, तिची किंमत खेडकरांच्या Thermovetara कंपनीकडून २० ते २२ लाख यायची. ज्या उद्योगानी त्यांच्याकडून चिमणी घेतली नाही अशा जवळजवळ १५ ते १७ फॉउंड्रिजना closure नोटीसा मिळाल्या.

आज पूजा खेडकर वापरात असलेली महागडी गाडी (Audi) याच कंपनीच्या मालकीची आहे.

या खेडकर महाशयांची किमान तीन वेळा विभागीय चौकशी (DE) झाली आहे. हेड ऑफिस मध्ये सर्वात जास्त वेळा चौकशी यांचीच झाली आहे. अनेक फायली फक्त खेडकर यांना समर्पित आहेत.

याच्या चौकशीची मागणी लघु उद्योग भारतीने पण केली होती. संभाजीनगर (औरंगाबाद) RO ऑफिस मध्ये याने भ्रष्टाचाराचे थैमान घातले होते. संभाजीनगरला Common Effluent Treatment Plant असूनसुद्धा व सर्व उद्योग CETP चे सभासद असून देखील त्यांचे कनसेन्ट मध्ये यांनी नको नको ते parameter घुसडले व पैसे उकळले. तिथे यांनी वेगळी पद्धत वापरली. RTI कार्यकर्ते यांना विविध माहिती देऊन उद्योग घटकाकडे पाठवायचे आणि उद्योजकांची पिळवणूक करायची. आम्ही लघु उद्योग भरती कडून याची तक्रार दिल्यावर याने आम्हालाच गोड भाषेत समजावले की या पोस्टिंग साठी दहा कोटी वर दिले आहेत. त्याची वसुली नको का करायला... एक प्रकरणात हे महाशय रंगेहात सापडले पण राजकीय वरदहस्ताने हाताखाली काम करणारे राठोड यांच्या वर सगळे थोपवून हे महाराज सुटले. या पूजा खेडकर प्रकरणाच्या निमित्ताने पुन्हा एकदा दिलीप खेडकरच्या फाईल पण उघडल्या तर बरे होईल. एकूणच महाराष्ट्रातील नोकरशाही मधील अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांना वेसण घालता येईल आणि राज्याच्या प्रगतीमधील अडसर दूर होतील.

**(माधव कुलकर्णी हे लघु उद्योग भारतीचे सांगली येथे कार्यकर्ते आहेत.)**

**फेसबुकवरून साभार**

लोकसंसद

## अंगणवाडी पासून मुलांना इंग्रजी शिक्षण?

अंगणवाडीतील बालकांना इंग्रजी विषयाची आवड बालपणापासून लागावी यासही आता अंगणवाडी केंद्रातून इंग्रजीचे धडे बालकांना देण्यात येत आहेत. याचा प्रारंभ शिराळा ता. अमरावती येथे झाल्याचे वृत्त वाचले. हा महाराष्ट्रातील पहिलाच प्रयोग आहे. जिल्ह्यातील २ हजार ५९२ अंगणवाडीतील केंद्रामधून ६६ हजार ३६३ चिमुकल्याना इंग्रजी विषयांचे धडे दिले जात आहेत. अंगणवाडी केंद्रातील चिमुकल्याना इंग्रजीचे धडे देणारा अमरावती हा राज्यातील पहिलाच जिल्हा आहे. ही बातमी नुकतीच वाचली. यासाठी दर महिन्याला दोन कविता, काही परिचित शब्द काही क्रियात्मक शब्द तीन अल्फाबेट व दोन अंक असा अभ्यासक्रम आहे. वास्तविक अंगणवाडीतील मुले अगदीचं लहान असतात. त्यांना खरेतर मातृभाषेतून शिक्षण हवे. इंग्रजी इयत्ता पहिलीपासून आहेच. मुलांची ग्रहणशक्ती मातृभाषेतून जास्त असते. इंग्रजी कवितेचा अर्थ त्यांना मराठीत कसा समजणार? शिवाय घरातील संस्कृती ही मराठी भाषेतून असल्यास त्या बालकांना हे अवघड जाण्याची शक्यता आहे. इयत्ता पहिलीपासून इंग्रजी आहेच. त्यामुळे बालवाडीपासून ते कशाला हवे? याबाबतीत खरे तर शिक्षण क्षेत्रातील नामवंतांचा सल्ला या बाबतीत घेणे जरुरीचे वाटते.

**- शांताराम वाघ, पुणे**

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**१९ जुलै**

**१३०९:-** संत नामदेवांचे गुरु, संत विसोबा खेचर समाधिस्थ (श्रावण शु.११, शके.१२३१). **१८६३:-** ख्रिस्ती धर्मप्रचारक, लेखक रेव्ह. डेव्हिड ओ. ॲलन यांचे निधन. मराठी भाषा शिकून त्यांनी बायबलचे मराठीत भाषांतर केले. तसेच 'खगोलविद्या', 'उपदेशसार', 'शास्त्राचा सारांश' ही पुस्तके लिहिली. **१९०२ :** लेखक, कवी, कोशकार, इतिहास संशोधक आणि शाहिरी वाङ्मयाचे अभ्यासक यशवंत नरसिंह केळकर यांचा जन्म १९ जुलै १९०२ रोजी झाला. पुण्याच्या टिळक विद्यापीठातून उच्च शिक्षण घेतल्यावर भारत इतिहास संशोधक मंडळात दिग्गज इतिहास संशोधकांबरोबर काम करण्याचा अनुभव मिळाला. शाहिरी वाङ्मयाच्या संशोधनाच्या आवडीतून 'ऐतिहासिक पोवाडे किंवा मराठ्यांचा काव्यमय इतिहास हा खंड जन्माला आला. मूळ मोडीलिखित असलेल्या पोवाड्यांचे कसोशीने संपादन करून अर्थबोधक व आवश्यक माहितीच्या टिपांसह तयार केलेला अशा प्रकारचा हा पहिलाच ग्रंथ. रिसायतकार सरदेसाईबरोबर पेशवे दप्तरात सहाय्यक म्हणून काम करण्याची संधीही त्यांना मिळाली. या निमित्ताने चिमाजी आप्पांच्या कर्तृत्वाने भारावून जाऊन त्यांनी वसईची मोहीम हा ग्रंथ लिहिला. ऐतिहासिक शब्दकोश' हा त्यांचा आणखी एक आगळा वेगळा ग्रंथ. काही काळ केसरीचे सहाय्यक संपादन केले होते. केसरीतून वेगवेगळ्या विषयांवर त्यांनी स्फूट लेखन केले. 'लाल ध्रुवावर भ्रमण', 'इतिहासातील सहली', 'वाङ्मयाचा वाफा' आदी लेखनाचे पुस्तका रुपांतर झाले. काव्यलेखनही त्यांनी केले. गीताद्विदल, गीतगुंफा, मनाचा मोहर हे त्यांचे काव्यसंग्रह. याशिवाय 'अंधारातील लावण्या' हा त्यांचा लावणीसंग्रहही वैशिष्टयपूर्ण आहे. तसेच 'मराठी शाहीर व शाहिरी वाङ्मय' हा विवेचक ग्रंथही त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या संपादित साहित्यात 'होळकरांची कैफियत' केळकर कुलवृत्तांत, केळकरांचा खाजगी पत्रव्यवहार आर्दीचा समावेश आहे. 'चित्रमय शिवाजी', 'म्हणी अनुभवाच्या खाणी' ही त्यांची आणखीही पुस्तके महत्त्वाची आहेत. या खेरीज 'वसईची मोहीम' हा त्यांचा आणखी एक महत्वपूर्ण ग्रंथ तसेच वाङ्मयाचा वाफा' हा निबंध संग्रह, तिसऱ्या महायुद्धाच्या 'छायेत' हे केसरीतून प्रसिद्ध झालेल्या परराष्ट्रीय राजकारणावरील लेखमाला लिहिणाऱ्या व दीर्घायुष्य लाभणाऱ्या केळकरांचे ८ फेब्रुवारी १९९४ रोजी निधन झाले. **१९१४:-** शब्दांबरोबर चित्राचीही भाषा जाणणारे लेखक, चित्रकार रमेश मुधोळकर यांचा जन्म. तब्बल ३०० हून अधिक पुस्तकांचे मुखपृष्ठ रेखाटणाऱ्या या लेखकाची लिम्का बुक ऑफ वर्ल्डने दखल घेतली. ५०हून अधिक बालसाहित्यावर त्यांनी पुस्तके प्रसिध्द झाली. याशिवाय, जेफ्री सॉसरच्या 'द कैन्टरबरी हेल्स' या ग्रंथाचा मराठीत अनुवाद केला. तसेच 'द टाइम मशीन', 'थर्टी नाईन स्टेप्स', 'द टेल्स फ्रॉम शेक्सपिअर', 'प्रेस्टर जॉन' आदी ग्रंथाचा त्यांनी अनुवाद केला. 'शालापत्रक' या लहान मुलांच्या मालिकाचेही त्यांनी काही काळ संपादन केले. **१९२१:-** मराठी साहित्याचे दालन पोलिस विषयक लेखणीने समृध्द करणारे विश्राम बापू कदम यांचा जन्म. यांचे 'पोलिस - नागरिक मार्गदर्शक', 'पोलिसांचा शिक्षक' ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. **१९२५:-** लेखक, वृत्तपत्र स्फूट लेखक आणि ब्रिटीश अमदानीत भारतीय वायुदलात कार्यरत असणारे यशवंत कर्णिक यांचा जन्म. त्यांच्या साहित्य संपदेत 'उरुस आणि इतर कथा', 'डोलकाठी व इतर कथा', 'ब्रह्मकमळ', 'त्रिवेणी', 'कुंपणवेल' (हे कथा संग्रह), 'दाटला चहूकडे अंधार' (तीन अंकी नाटक), 'निळा डोह', 'शोधितो किनारा', 'पंखहीन (ह्या कादंबऱ्या) प्रसिध्द. 'पहाटेचे रंग' ह्या ललित लेखनासह 'केवळ एक पांथस्थ' हे आत्मचरित्र त्यांचे प्रकाशनाच्या मार्गावर आहे. **१९३१:-** लेखक, समीक्षक मधुकर सुदामा पाटील यांचा जन्म. 'कवीमनः स्वरुप व शोध', 'ज्ञानेश्वर व तुकारामांच्या संदर्भात' या त्यांच्या प्रबंधाला पुणे विद्यापीठात उत्‍.ष्ट प्रबंधाचे पारितोषिक मिळाले. 'दलित साहित्य', 'भारतीयांचा साहित्यविचार', 'साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध' तसेच बालकवी, सदानंद रेगे, इंदिरा यांच्या काव्याचा वेध घेणारे ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. **१९३४:-** सुप्रसिध्द गोमंतकीय लेखक, प्रेमानंद वा. मडकईकर यांचा जन्म. पेशाने वकील. त्यांच्या साहित्य संपदेत 'संग्राम' ही गोवामुक्तीवर बेतलेली कादंबरी, 'भावली' ही हृदयस्पर्शी सामाजिक कादंबरी, 'प्राक्तन' ही स्त्री जीवनावरील विदारक कादंबरीसह 'हिटलरची प्रेयसी इव्हा ब्राऊन' हिच्या व्यक्तिमत्वाचा वेध घेतला आहे. **१९३५:-** भारताचार्य सु. ग. शेवडे यांचा जन्म. आतापर्यंत दहा हजाराहून अधिक कीर्तने प्रवचने करणाऱ्या सु. ग. नी 'चित्रगुप्त एक शास्त्रीय सिध्दोत', '१९७१ चे अभिमन्यू', 'नऊ महर्षी', 'शेवडेंजीची अमेरिकेतील प्रवचने', 'शंभू राजे', 'भारतीय संस्‍.ती आणि महाभारतातील कौरव पांडवांची संपूर्ण कथा महर्षी व्यासांच्या लेखणीनुसार सांगणारे कथा भारत' हा ग्रंथ मिळून पंधरा एक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९३८:-** आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ आणि विज्ञानलेखक जयंत विष्णू नारळीकर यांचा जन्म. 'यक्षाची देणगी' या विज्ञानकथा संग्रहानंतर 'प्रेषित', 'वामन परत न आला', 'व्हायरस' या विज्ञान कादंबऱ्या तसेच 'गणितल्या गमती जमती', 'खगोलाचे विश्व', 'आकाशाशी जुळले नाते' आदी पुस्तके व 'चार महानगरातील माझे विश्व' हे आत्मवृत्त त्यांनी लिहिले आहे. **१९६०:-** लेखक, व्याख्याते देवीदास फुलारी यांचा जन्म. त्यांच्या लेखन संपदेत 'पाच आऱ्यांचे चाक', 'दुधावरची साय', 'देश जोडण्याचा खेळ', 'वसंतडोह' ह्या किशोर कादंबऱ्या. 'अक्षरनारायणी', 'वेधांच्या प्रदेशात' हे समीक्षात्मक लेखन. 'कविता क्रांतीच्या', 'राधा' हे कवितासंग्रह तसेच 'फुलपाखरांचा गाव (बालकवितासंग्रह), 'अपंगाचे शिक्षण', 'आपला टेलिफोन' ह्या बालकथा आणि 'वादळवेल', 'अनुगामी' ही संपादने अशी साहित्यसंपदा.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१९ जुलै

१) श्रीम. वसुधा प्रभाकर शेंबेकर
श्रीबाग-२, अलिबाग, १९-०७-१९३६

२) श्री.अशोक रामचंद्र काठे
कामथ, अलिबाग, १९-०७-१९४८

३) श्री. प्रभाकर शिवराम गुरव
वेश्वी, अलिबाग १९-०७-१९४९

४) श्री.मधुकर लक्ष्मण बेलोसकर
चेंढरे, अलिबाग १९-०७-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# कोतवाल मार्केट रस्त्याची दुरवस्था

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**माथेरान या पर्यटनस्थळी असलेल्या हुतात्मा भाई कोतवाल शॉपिंग सेंटर मधील रस्त्याची दुरवस्था झालेली आहे. तसेच, या भागातील विजेच्या वाहिन्या देखील हाताला लागतील एवढ्या उंचीवर आहेत. त्यामुळे या शॉपिंग सेंटरमध्ये मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. येथील व्यापाऱ्यांच्यावतीने रामलाल खेर यांनी पालिकेला पत्र देऊन रस्त्याची सुधारणा करण्याची मागणी केली आहे.**






माथेरान शहरात पालिकेने मुख्य बाजारपेठ नंतर पिसारनाथ मार्केट आणि हुतात्मा भाई कोतवाल शॉपिंग मार्केटची निर्मिती केली होती. पिसारनाथ मार्केट हे रिगल नाका येथे असून कोतवाल शॉपिंग सेंटर हे रेल्वे स्टेशन समोर आहे. या मार्केट मधील गाळे स्थानिक व्यवसायिकांचे असून हुतात्मा कोतवाल मार्केटमध्ये स्थानिक व्यवसायिकांना पावसाळ्यात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. कारण या मार्केटची रचना ही उतार भाग अशी आहे. त्यामुळे पावसाळ्यात या मार्केट मधून पाण्याचे पाट वाहत असतात. यामुळे रस्त्यावर लावण्यात आलेले पेव्हर ब्लॉक हे निखळून गेले असून रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. पाणी गटारातून न जाता थेट महात्मा गांधी रस्त्याने वाहत येते. यामुळे या पाण्याला मार्ग काढून देण्यात यावा, अशी मागणी स्थानिक व्यापारी आणि माथेरान पालिकेचे माजी नगरसेवक आंबो चौधरी यांनी अनेकवेळा माथेरान पालिकेकडे केली आहे. मात्र, पालिकेला मोठ्या व्यावसायिक मार्केटकडे लक्ष द्यायला वेळ नसल्याचे आरोप येथील स्थानिक व्यापारी करीत आहेत.

### धोकादायक वीज वाहिन्या

**माथेरान शहरातील या महत्वाच्या शॉपिंग मार्केट मधील वीज वाहिन्या देखील उघड्यावर असून या वीज वाहिन्यांमुळे अपघात होण्याची शक्यता आहे. रस्त्याची दुरुस्ती करण्याच्या मागणीसाठी स्थानिक व्यवसायिक रामलाल खेर यांनी माथेरान पालिकेला पत्र देऊन रस्त्याची सुधारणा करावी, अशी मागणी केली आहे. खेर यांनी आपल्या अर्जात हुतात्मा भाई कोतवाल शॉपिंग सेंटर मधील डोक्याजवळ आलेल्या वीज वाहिन्या आणि उघड्यावर असलेल्या वीज वाहिन्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.**

## जाधव यांची अध्यक्षपदी निवड

**। खांब । वार्ताहर ।**

धाटाव औद्योगिक वसाहत येथील बहुचर्चित भक्ती सागर सोसायटीच्या अध्यक्षपदी प्रशांत रघुनाथ जाधव यांची निवड करण्यात आली.



या सोसायटीची २०२३ ते २०२८ साठी कमिटी स्थापन करण्यात आली होती. परंतु, जुन महिन्यात प्रकृती अस्वस्थामुळे किरण पागे यांनी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला असल्याने हे पद रिक्त झाले होते. सहाय्यक निबंधक कार्यालयाच्या सूचनेनुसार व त्या कार्यालयातील अधिकारी कावळे यांच्या उपस्थितीत ८ जुलै रोजी कमिटी मिटिंग घेऊन पुढील कालावधीसाठी अध्यक्ष म्हणून प्रशांत जाधव यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

# पालीमध्ये समन्वय समितीची बैठक

**। पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुका समन्वय समितीची बैठक सोमवारी (दि.१५) तहसील कार्यालयातील हिरकणी कक्षेत पार पडली. या बैठकीत अंबा नदी प्रदूषण, कंपन्यांमधील अनधिकृत बांधकामे, जलजीवनश मिशन योजनांची कामे अशा अनेक महत्वाच्या विषयांकडे यावेळी लक्ष वेधण्यात आले.



सुधागड तालुक्यातील रासळ ग्रामपंचायत हद्दीतील काही केमिकल कंपन्यामधील रसायनयुक्त सांडपाणी कंपनीच्या मागील बाजूस असणाऱ्या अंबा नदीत सोडले जाते. तसेच, येथील काही कंपन्यांमध्ये परवानगी न घेता अनधिकृत बांधकामे केली जात असल्याचा आरोप नरेश खाडे यांनी समन्वय समितीच्या बैठकीत केला. यावर समन्वय समितीचे अध्यक्ष अनुपम कुलकर्णी यांनी सांगितले की, हा अतिशय गंभीर असून तहसीलदार यांनी याकडे तात्काळ लक्ष देऊन वरिष्ठ पातळीवर निर्णय घेऊन संबंधित विभागाकडून कंपन्यांना नोटीस देण्यात याव्यात.

सुधागड तालुक्यात होत असणाऱ्या जल जीवन मिशनच्या कामाकडे समन्वय समितीचे सदस्य अरविंद फणसे यांनी लक्ष वेधले. काही ठिकाणच्या विहिरींना पाणीच लागलेले नाही, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. मात्र, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी हा आरोप फेटाळला. यावर अध्यक्षांनी या कामाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्यात येईल, असे सांगितले. लाडकी बहीण योजनेचा तालुक्यातील महिलांना फायदा मिळवून देण्यासाठी कॅम्प घेऊन त्यांना दाखल्याची व्यवस्था करावी, अशी मागणी यावेळी अध्यक्ष कुलकर्णी यांनी तहसीलदारांकडे केली.

यावेळी समन्वय समितीच्या बैठकीला काही शासकीय अधिकाऱ्यांनी दांडी मारली. यामुळे महिला सक्षमीकरण आणि सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार निर्मितीच्या विविध शासन योजना आणि उपक्रम सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात अधिकारी सपशेल अपयशी ठरले असल्याची खंत सुधागड तालुका समन्वय समितीचे अध्यक्ष अनुपम कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

यावेळी तहसीलदार उत्तम कुंभार, नायव तहसीलदार भारत फुलपगारे, नायब तहसीलदार ज्ञानेश्वर अडसुळे, समन्वय समितीचे सदस्य संजय म्हात्रे, संदीप दपके, अमोल कांबळे, अरविंद फणसे, गणेश शिंदे आदींसह सदस्य विविध शासकीय विभागाचे अधिकारी व पत्रकार उपस्थित होते.

## माउली फाउंडेशनकडून शालेय साहित्य वाटप



**। अलिबाग । वार्ताहर ।**

माउली फाउंडेशन यांच्या माध्यमातून अलिबाग तालुक्यातील थळ चाळमळा या जिल्हा परिषदेच्या शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. माउली फाउंडेशन गेली तीन वर्षे नियमितपणे येथील सर्व विद्यार्थ्यांना उत्तम प्रतिचे शालेय दप्तर, कंपास, वह्या, रंगपेटी, वह्या आणि इतर आवश्यक साहित्याचे वाटप करीत आहेत. या वितरण सोहळ्याला माउली फाउंडेशनचे अध्यक्ष समीर राणे, नितीन भगत, अनिकेत पाटील, विनीत भगत, अंधन भगत, हर्ष रसाळ, अजिंक्य पाटील, यश वाळंज, अभिजित जैतापकर, मुख्याध्यापक धनंजय म्हात्रे, साक्षी पाटील, प्रियांका शिंदे, अरुण मांडवेकर आदी मान्यवर, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## गोवे शाळेत विविध संतांचे दर्शन

**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोवे येथे आषाढी एकादशी निमित्ताने विठ्ठल नामाची शाळा भरवण्यात आली होती. यावेळी विविध वेशभूषात संतांचे दर्शन झाले. बुधवारी (दि.१७) आषाढी एकादशी निमित्त लाखो वारकरी पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी जात असतात. परंतु, याच आषाढी एकादशी निमित्त गोवे शाळेत मुलांच्या रूपात विठ्ठल दर्शन झाले. जणू पंढरीच येथे अवतरली असल्याचे दिसून आले. यावेळी शाळेतील छोट्या मुलांनी विठ्ठल-रुख्मिणी तसेच संत तुकाराम, संत जनाबाई, संत सखुबाई, संत मीराबाई, संत मुक्ताबाई, संत पुंडलिक अशा संताच्या वेशभूषा केल्या होत्या.

## एका दिवसात २९ प्रकरणे निकाली

**। पनवेल । वार्ताहर ।**

राज्यातील बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात अग्रणी असलेल्या राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या कामकाजाची सुनावणी पनवेल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाच्या सभागृहात सोमवारी पार पडली.

यावेळी सकाळ व दुपारच्या सत्रात शालेय शिक्षण विभागाशी संबंधित २१ प्रकरणे निकाली लागली. तसेच, महिला बालविकास विभागाशी संबंधित ८ प्रकरणे निकाली लागली आहेत. बालकांच्या हक्कांसंबंधीच्या विविध प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा डॉ. सुशीबेन शाह स्वत: हजर राहिल्या होत्या. यावेळी, पुन्हा एकदा त्यांच्या कामाचा धडाका दिसून आला.

सुनावणी दरम्यान, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिनियम २००९, पोस्को कायदा जेजे ऑफ आणि बालहक्क अधिनियमन २००५ अनन्वये प्राप्त तक्रारीवर सुनावणी झाली. शाळा सोडल्याचा दाखला न देणे, शिक्षणापासून वंचित ठेवणे, शालेय फी न भरल्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणापासून वंचित ठेवणे, शाळेचा मनमानी कारभार, बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क अधिनियमन २००९ ते २५ टक्के आरक्षित प्रक्रिया २०१९ अंतर्गत प्रवेश नाकारणे, शिक्षकाच्या बदली विरुद्ध झालेल्या आंदोलनामध्ये अल्पवयीन मुलाचा समावेश करणे, फी न भरल्यामुळे अपमानास्पद वागणूक, शाळेकडून होणारी पिळवणूक, मुलांवर मानसिक दडपण आणणे अशाप्रकारच्या रायगड जिल्ह्यातील २९ सुनावण्या घेण्यात आल्या.



## आदिवासी मुलांना भेटवस्तु

**। आपटा । वार्ताहर ।**

वनवासी कल्याण आश्रमातर्फे बुधवारी (दि.१७) माडप कातकरवाडी मध्ये संस्कार वर्गाला शालेय वस्तंचू वाटप करण्यात आले. यावेळी एकूण २५ मुलांना दप्तर, वह्या, कंपास, इतर वस्तू आणि खाऊचे वाटप दर्शना फाळके व अपर्णा मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला रेवती कातकरी, सुचेता जोशी, अनघा, जयश्री वाघमारे, जयश्री घोडविंदे आणि वाडीतील ग्रामस्थ व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जामगाव-ढोकलेवाडी दिंडीने दुमदुमली

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील अनेक ग्रामीण भागात ठिकठिकाणी आषाढी एकादशी निमित्त जेष्ठ नागरिक, तरुण वर्ग तसेच शालेय विद्यार्थ्यांनी परिसरातील विठ्ठल-रखुमाई मंदिरापर्यंत पायी दिंडी काढुन विठु नामाचा गजर करत टाळ मृदुंगाच्या तालात विठुरायाचे दर्शन घेतले.



यावेळी जामगाव प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका प्रिया टोकसे यांनी विद्यार्थ्यांना पारंपारिक पोषाखात वारकरी करुन पायी दिंडी काढली होती. या दिंडीत तमाम ग्रामस्थ ही पारंपारिक पोशाख करुन सहभागी झाले होते. यावेळी हरिनामाचा जप, फुगड्या, टाळमृदंगानी सारा परिसर दुमदुमला होता. लहान मुलांनी छोटी पालखी हातात घेऊन त्यामध्ये विठ्ठल-रखुमाईची मूर्ती विराजमान करून गावातील विठ्ठल रखुमाई मंदिरा पर्यंत पायी दिंडीचा आनंद लुटला.

यावेळी मोठ्या संख्येने महिलांनी आपल्या डोक्यावर तुळशी रोप घेऊन दिंडीत सहभाग दर्शविला होता. या दिंडीत जामगाव व आठलेवाडीचे ग्रामस्थ ही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच, ढोकलेवाडी येथील ग्रामस्थांनी सुद्धा आपल्या गावाच्या मंदिरात टाळ मृदुंगाच्या स्वरात मोठ्या भक्ती भावाने आषाढी एकादशी सोहळा भक्तीमय वातावरणात साजरा केला.

## अलिबाग शहरात दिंडीला उत्स्फुर्त प्रतिसाद



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग बाजारपेठमधील नागरिकांनी महाराष्ट्राला लाभलेल्या संस्कृतीचा वारसा जपत आषाढी एकादशी निमित्त दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. टाळ व मृदंगाच्या तालात ही दिंडी अलिबाग शहरात फिरवून ती वरसोली येथील विठ्ठल मंदिर येथे आणण्यात आली. या दिंडीचे हे चौथे वर्ष असून दिंडीला नागरिकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी दिंडीसाठी सुमारे ६०हून अधिक भाविकांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांनीदेखील उत्स्फुर्त सहभाग घेऊन या सोहळ्याचा आनंद घेतला. दरम्यान, संपुर्ण शहरामध्ये एक भक्ती भावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## वारी परंपरा आजही अखंडित सुरु-विजय नाहटा

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

आषाढी एकादशी वारीची परंपरा ही सुमारे ८०० वर्षांपेक्षाही अधिक जुनी आहे. महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून लाखो भाविक विठ्ठलनामाचा गजर करत ही परंपरा जपत आहेत. वारकरी संप्रदायामध्ये लहान-मोठा, श्रीमंत-गरीब हा भेद नसून वारकऱ्यांच्या मुखात केवळ पंढरीच्या पांडुरंगाचा आणि विठ्ठलनामाचे स्मरण, गजर अखंडित सुरु असतो. नवी मुंबईतून पांडुरंगाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने वारकरी जात असतात, तर विविध धार्मिक भक्त मंडळींकडून आषाढी एकादशीच्या दिवशी भाविकांना प्रत्यक्ष विठ्ठलाचे दर्शन घडवीले जाते. ही परंपरा आजही अखंडित सुरूच असल्याच्या भावना विजय नाहटा यांनी आषाढी एकादशी निमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमात बोलताना व्यक्त केल्या.



नवी मुंबईतील वाशी, नेरुळ, बेलापूर, तुर्भे आग्रोळी, करावे गांव, सानपाडा आदी विविध ठिकाणी आषाढी एकादशी निमित्ताने विजय नाहटा फाउंडेशनच्या सहकार्याने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नेरुळ मध्ये श्री विठ्ठल रखुमाई सेवाभावी संस्था आणि विजय नाहटा फाउंडेशन यांच्या सहकार्याने दिलीप घोडेकर यांनी विठ्ठल दर्शन सोहळ्याचे आयोजन भाविकासाठी केले होते.

## विठ्ठल नामाने उरण दुमदुमले

**। उरण । वार्ताहर ।**

आषाढी एकादशी निमित्त उरण शहरासह ग्रामीण भागात देखील ठीक-ठिकाणी पायी दिंडी व पालखी काढण्यात आली होती. यावेळी विठ्ठल नामघोषाने संपुर्ण उरण शहर दुमदुमले होते. येथील महिलांनी आपल्या डोक्यावर तुलसी घेऊन विठ्ठल नामस्मरण करीत होत्या. तर, पुरुष वारकरी मंडळी विठ्ठल नामाचा जयघोष करीत होते. उरण तालुक्यात भेंडखल, चिरनेर, उरण शहरातील देऊळ वाडी, मोरा, बोरी नाका आदी ठिकाणाहून विठ्ठल रखुमाई मंदिरातून दिंडी-पालखी काढण्यात आल्या होत्या.



**● अलिबाग तालुक्यातील उसर येथील विद्यार्थीनींनी पारंपारिक वेशभुषा करत पायी दिंडीत उत्स्फुर्त सहभाग घेतला होता.**

### आषाढी एकादशी निमित्त वृक्ष लागवडीचा जागर

# बेलोशी हायस्कूलमार्फत कृषी दिंडी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील बेलोशी येथील को.ए.सो. लोकनेते ॲड. दत्ता पाटील हायस्कूलच्यावतीने बुधवारी (दि.१८) आषाढी एकादशी निमित्त कृषी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडी निमित्त वृक्ष लागवडीचे महत्व पटवून देण्यात आले.**

या कृषी दिंडीचे आयोजन शाळेचे सभापती प्रकाश खडपे, मुख्याध्यापक बोंद्रे, शिक्षक सचिन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या दिंडीला ॲड. दत्ता पाटील बेलोशी शाळेच्या आवारातून सुरुवात करण्यात आली होती. ही दिंडी संपूर्ण बेलोशी गावातून फिरवत विठ्ठल मंदिराकडे मार्गस्थ झाली. यावेळी ग्रामस्थांनी दिंडीसह शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांचे स्वागत केले.





या दिंडीनिमित्त विद्यार्थ्यांनी विठ्ठल नामाचा जयघोष करीत ग्रामस्थांना वृक्ष लागवडीचे महत्व पटवून दिले. यासाठी को. ए. सो. लोकनेते ॲड. दत्ता पाटील शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी या दिंडीमध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांसोबतच ग्रामस्थांनीही या दिंडीत उत्स्फुर्त सहभाग घेतला होता. तसेच, दिंडीतील विद्यार्थ्यांनकडून विठ्ठल रुक्मीणी, संत ज्ञानेश्वर, संत सोपान, संत निवृत्ती, मुक्ताई तसेच संत तुकाराम यांची वेशभुषा करण्यात आली होती. तसेच, या दिंडीचे व विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

## माऊलीच्या पालखीचे स्वागत

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील जसखार गावचे राजेश पाटील यांनी आषाढी एकादशी निमित्त मोरा कोळीवाडा ग्रामस्त यांच्यावतीने माऊलीची पालखी काढण्यात आली होती. मोरा येथुन निघालेल्या दिंडी व पालखीचे स्वागत पी.जे. पाटील यांच्या घराजवळ करण्यात आले. पालखीची सांगता समारोप पिरवाडी येथील समुद्रकिनारी करण्यात आला. यावेळी पी.जे. पाटील यांचे सुपुत्र राजेश पाटील व कांचन राजेश पाटील यांनी सर्व वारकरी मंडळींचे स्वागत केले. या कामी कैलास म्हात्रे, भावना म्हात्रे, चार्वी पाटील व कार्यक्रमाचे आयोजक समर्थ पाटील, मनिषा निवेडकर, दत्तात्रेय घरत, काशीनाथ ठाकुर, गयाबाई वर्तक व रवी चव्हाण यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



निवडक

## चर्चासत्राचे आयोजन

**माणगाव :** हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स महाडच्या वतीने कॉर्पोरेट क्षेत्रातील मानवी मूल्ये या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून संदीप काशीद उपस्थित होते. सेमिनारची सुरुवात सरस्वती पूजा आणि दीप प्रज्वलनाने करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य सुदेश कदम यांनी कॉर्पोरेट जगताशी जोडण्याचे महत्त्व सांगून चर्चासत्राच्या मुख्य उद्दिष्टांची मांडणी केली.

## पुरवणी परीक्षा झाली सुरू

**रायगड :** राज्य मंडळातर्फे दहावी आणि बारावीची पुरवणी परीक्षा मंगळवारपासून सुरू झाली आहे.गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांच्या नोंदणीमध्ये मोठी घट झाल्याचे दिसून येत आहे.रायगड जिल्ह्यात इयत्ता दहावीची ६१२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून इयत्ता बारावीसाठी ९६२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. जिल्ह्यात २० केंद्रांवर हि परीक्षा घेतली जात आहे. अशी माहिती रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाने दिली.

## ऑनलाईन कविसंमेलन संपन्न

**माणगाव :** कोकण मराठी साहित्य परिषद शाखा तळा यांच्या वतीने ऑनलाईन कवी संमेलन संपन्न झाले. कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य प्रा.एल.बी.पाटील होते. या कवी संमेलनात हेमंत बारटक्के, नारायण पानावकर, किरण केळुसकर, शिल्पा मोहिते, मंदाकिनी हांडे, प्रतीक्षा नगरकर, रघुनाथ पोवार, उषा खोत, संजय होळकर ,नैनिता कर्णिक, प्रज्ञा मराठे, सिद्धेश लखमदे, अनिता कांबळे, सत्यवान घाडी यांनी कविता सादर केल्या

## शेतात गाण्याचे घुमले सूर

**पाताळगंगा :** पावसाने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. बळीराजाच्या औताच्या गीतांच्या मैफिलीने रंगून जात आहे. रानपाखरांच्या गाणाऱ्या स्वर अन बळीराजाची शाहीर गीते, सर्जा-राजाच्या गळ्यातील घुंगारांचा आवाज या. मंजूळ स्वरांनी रानोमाळ संगीतमय झाला असून शेतीची कामे करण्यास बळीराजा मग्न झाला आहे. औतावरील गीतांच्या मधुर मैफलीमध्ये सर्जा राजाच्या नावाने गीत, ओव्या, बैलांना हाक देणे असे चित्र सध्या पाहावयास मिळत आहे.

## कंटेनरला अपघात

**नेरळ :** कर्जत-मुरबाड राज्यमार्गावर वारे-खैरपाडा गावाजवळ भरधाव येणाऱ्या कंटेनरचा अपघात झाला.सुदैवाने जीवितहानी झाली नसली तरी कंटेनर रस्त्यात पलटी झाला. कंटेनरचे दोन भाग झाल्याचे दिसून आले आहे. खोपोलीवरून मुरबाडच्या दिशेने कंटेनर सकाळी १० वाजण्याच्या सुमारास लोखंडी प्लेट घेवून चालला होता. वारे खैरपाडा येथील वळणावर कंटेनरचा एक्सल तुटल्याने चालकाचा गाडीवरील ताबा सुटून हा अपघात घडला असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# मागासवर्गीयांना मिळणार उभारी

## ■ राजिप कृषी विभागाचा पुढाकार

प्रमोद जाधव
। अलिबाग ।

**अनुसूचित जाती, जमातीच्या शेतकऱ्यांना उभारी देण्यासाठी जिल्हा परिषद कृषी विभागाने पुढाकार घेतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या माध्यातून त्यांना बळकट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. एक कोटी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**






रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनुसूचित जाती, जमातीच्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून जीवनमान उंचावणे हा उद्देश समोर ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत करण्यात आली आहे. नवीन विहीर जुनी विहीर दुरुस्ती, पंपसंच, शेततळ्याचे प्लास्टीक अस्तरीकरण सुक्ष्म सिंचन संच, वीज जोडणीसाठी अनुदान दिले जाणार आहे. हे अनुदान १० हजार रुपयांपासून अडीच लाखापर्यंत आहे.

अनुसूचित जातीमधील लाभार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेसाठी ६० लाख रुपये, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेसाठी (क्षेत्राबाहेरील-क्षेत्राआतील) ६० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सुमारे ३०० हून अधिक शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असल्याची माहिती कृषी विकास अधिकारी मिलींद चौधरी यांनी दिली. वैयक्तिक लाभार्थी म्हणून नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांना वैयक्तिक तपशील भरणे बंधनकारक असणार आहे. योजनांच्या आवश्यकतेनुसार पिकांचा तपशिल, कुटुंबाचा तपशील, वीज उपलब्धतता, सिंचन स्त्रोत बाबींचा तपशील सादर करावा लागणार आहे. अर्जदार शेतकऱ्यांनी अर्ज करण्यासाठी महाडिबीटी पोर्टलच्या संकेतस्थळावर आपला अर्ज दाखल करून वैयक्तिक लाभार्थ्याला हा पर्याय वापरावा लागणार आहे.

> “रायगड जिल्ह्यातील अनुसूचित जाती, जमातीच्या शेतकऱ्यांना बळकट करण्यासाठी या योजना लागू करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ मोठ्या प्रमाणात घ्यावा. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी यांच्याशीसंपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.”
>
> – मिलींद चौधरी
> कृषी विकास अधिकारी,
> रायगड जिल्हा परिषद

### परसबागेसाठी प्रोत्साहन

गावे, वाड्यांतील नागरिकांना घरच्या घरी भाजी पिकवता यावा. यासाठी रायगड जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत परसबाग करण्यास प्रोत्साहन देण्यात आले आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना अनुदानाच्या स्वरूपात ५०० रुपये दिले जाणार आहे. जिल्हा परिषदेने हा नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. ऑनलाईन अर्ज केल्यावर त्याला मंजूरी मिळाल्यानंतर हे अनुदान त्यांच्या खात्यात जमा होईल, असे सांगण्यात आले आहे.



## मुरूडमध्ये भातशेती लागवड

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यात ३३०० हेक्टर क्षेत्र भात पिकासाठी लागवड असून त्यापैकी ३२५० हेक्टरमध्ये भातपिकाची लागवड करण्यात आली. तालुक्यातील शेतकरी सुवर्णा, रुपाली, कर्जत २ व ५, ८ चिंटु साई, जया, तांबामैसुरी या तांदळाची लागवड शेतकऱ्यांकडुन केली जाते. जुलै या महिन्यात पाऊसाची दमदार हजेरी लागली असून शेतकरी राजा सुखावला आहे. या पावसामुळे शेतात पाणी साचल्याने शेतकऱ्यांनी लावणीला प्रारंभ केला आहे.

अवघ्या वीस दिवसातच पेरणी करण्यात आलेली भाताची रोपे योग्य प्रकारे वाढल्याने भात शेतीच्या लावणीला प्रारंभ झाला आहे.दरवर्षी पाऊस होतो. परंतु बऱ्याच वर्षात अतिशय समाधानकारक असा पाऊस यंदा होत असल्याने येथील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. भाताची पेरणी झाल्यापासून वरून राजाने येथील शेतकऱ्यांवर कृपादृष्टी केल्याने येथील शेतकरी शेतीच्या मशागतीला लागले असून, सर्वत्र भागात भातशेतीच्या लावणीला प्रारंभ झाल्याचे चित्र दिसत आहे.

आजच्या परिस्थितीत न परवडणारी शेती कसदार बनविण्यासाठी येथील शेतकरी पुढे सरसावत आहे.नागरणीसाठी बैलांचा नागर तर काही ठिकाणी पॉवर टिलर यंत्राच्या साहाय्याने नांगरणी करण्यात येते. शेतकऱ्याच्या घरातील माणसे विशेष शेतात मशागत करत नसून, मजुरीने माणसे घेऊन लावणी करण्याचा कल अधिक प्रमाणात असल्याने आजच्या स्थितीत भातशेती करणे शेतकऱ्याला परवडत नाही.

## विरार-अलिबागचे भूसंपादन मंदावले

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मुंबईसह परिसरातील विकासाला गती देणाऱ्या विरार- अलिबाग मल्टीमॉडेल कॉरिडॉरसाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाचा वेग मंदावला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी राज्य रस्ते विकास महामंडळाला तब्बल ११३० हेक्टर एवढ्या जमिनीची आवश्यक आहे, मात्र आतापर्यंत महामंडळाने केवळ २० टक्के म्हणजेच २३१ हेक्टर जमीन संपादित केली आहे. यावरून सदर प्रकल्पासमोर भूसंपादनाची मोठी समस्या उभी राहणार असल्याचे दिसत आहे.

एमएसआरडीसी पहिल्या टप्प्यात विरार-बालवली हा सुमारे ९६ किमीचा महामार्ग तयार करणार आहे. दरम्यान, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला जवळपास ११३० हेक्टर जमीन लागणार असून त्याचा खर्च २२ हजार २२३ कोटी रुपये आहे. एमएसआरडीसीकडून भूसंपादनासाठी विशेष प्रयत्न केले जात असले तरी त्यांना फारसे यश मिळत नसल्याचे दिसत आहे.

या कॉरिडॉरसाठी ११२ हेक्टर खासगी जमीन मिळाली असून ७८ हेक्टर सरकारी, तर ४१ हेक्टर वन जमीन संपादित झाली आहे. प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या एकूण जमिनीचा विचार करता केवळ २० टक्के एवढीच जमीन मिळाली आहे. दरम्यान, संपादित झालेल्या जमिनीचे निवाडे आणि जमिनीचे मूल्यांकन सुरू आहे.

सरकार सुमारे ६३ हजार कोटी रुपये खर्च करून एमएसआरडीसीचा विरार-अलिबाग कॉरिडॉर उभारणार आहे. त्यासाठी हुडकोकडून कर्ज घेतले जाणार होते, मात्र राज्य सरकारच्या अर्थसंकल्पीय तरतुदीशिवाय कर्ज देण्यास हुडकोने नकार दिला आहे. त्याची दखल घेत एम एसआरडीसीने भूसंपादनासाठी आवश्यक असलेला निधी कर्ज रोख्यांच्या माध्यमातून उभारण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. त्यामुळे निधी उभारण्यात कोणतीही अडचण येणार नसल्याचे एमएसआरडीसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने स्पष्ट केले आहे.

## आंबा छाटणी प्रशिक्षण

**। खांब । वार्ताहर ।**

कृषी महाविद्यालय दापोलीच्या चतुर्थ वर्षातील ग्रामीण जागृती कार्यानुभव कार्यक्रमाच्या कृषी संजीवनी गटाने आंबा छाटणी प्रशिक्षण व बोर्डो पेस्ट तयार करण्याचे प्रात्यक्षिक या प्रयोगाचा कार्यक्रम खांब गावातील कृषीनिष्ठ शेतकरी रामचंद्र चितळकर यांच्या शेतावर करण्यात आला.

आंब्याच्या कापणी व शिक्षणाच्या तंत्रज्ञानाबद्दल प्रायोगिक देण्यात होती. कापणीसाठी योग्य ऋतु, झाडांच्या संरचनेनुसार कापणीचे तंत्र, शेती शस्त्रावरील केंद्र उघडा गगर, विविध किडे आणि रोगांवर कारवाईसाठी बोर्डो पेस्टची आवश्यकता आदींबाबत कृषी संजीवनी गटातील विद्यार्थ्यांनी त्या शेतकऱ्यांना प्रायोगिक आणि तंत्रज्ञानाने संबंधित सर्व तंत्रज्ञानिक व प्रायोगिक माहिती दिली.




### पुनाडे धरणात ७० टक्के पाणी साठा

## उरणकरांची जल चिंता दूर

**। उरण । वार्ताहर ।**

उरणला पाणीपुरवठा करणाऱ्या दोन धरणक्षेत्रात चांगला पाऊस झाल्याने रानसई धरण भरुन वाहू लागले आहे.तर पुनाडे धरणात ७० टक्के पाणी साठा वाढला आहे. त्यामुळे उरणकरांच्या पाण्याचा प्रश्न सुटला असून जल चिंता दूर झाली आहे.एकंदरीत रानसई धरण तुडूंब भरुन वाहू लागल्याने पर्यटकांची पावले हळूहळू रानसई धरण परिसरातील निसर्गरम्य परिसराचा आनंद लुटण्यासाठी वळली आहेत.

रानसई धरणाची पाणी साठवून ठेवण्याची क्षमता १००० कोटी म्हणजे १० एम.सी.एम.इतकी असून या धरणातून उरणमधील औद्योगिक कारखान्यासह येथील २० पेक्षा अधिक ग्रामपंचायतीना व उरण नगर परिषदेला पाणीपुरवठा होतो. तर पुनाडे धरणाची पाण्याची क्षमता १.७५ एम.सी.एम एवढी असून उरण पूर्व विभागातील पुनाडे, वशेणी, सारडे, पिरकोण, पाले, गोठवणे, आवरे, कडापे या गावांतील रहिवाशांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे.या दोन्ही धरणक्षेत्रात चांगला पाऊस झाल्याने रानसई धरण तुडूंब भरुन वाहू लागले आहे.तर पुनाडे धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झपाट्याने वाढ होत आहे. त्यामुळे पाण्याचा प्रश्न सुटला असून जल चिंता दूर झाली आहे.

पर्यटकांना भुरळ घालणारे निसर्गरम्य रानसई धरण तुडूंब भरुन वाहू लागल्याने पर्यटकांची पावले हळूहळू ही रानसई धरणाच्या दिशेने वळली असल्याचे चित्र पहावयास मिळत आहेत.





## कर्जत येथील प्रति पंढरपूर येथे वारकऱ्यांची मांदियाळी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत येथे ५५ फूट उंचीच्या श्री विठ्ठल मूर्तीच्या परिसरात आषाढी एकादशी निमित्त वारकरी आणि भक्तांची मांदियाळी भरली होती. पंढरपूर येथे आपल्या लाडक्या विठ्ठलाचे भेटी जाता आले नाही अशा भक्तांनी प्रति पंढरपूर आळंदी येथे दिवसभर गर्दी करून विठनामाचा गजर केला.

उल्हासनदीच्या तीरावर प्रति पंढरपूर आळंदी साकारली आहे. आमदार महेंद्र थोरवे यांच्या संकल्पनेतून तब्बल ५५ फूट उंचीची भगवान विठ्ठलाची मूर्ती कर्जतच्या वैभवात भर घालणारी ठरत आहे. आज आषाढी एकादशी असल्याने दिवसभर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.भाविकांची गर्दी होणार हे लक्षात घेऊन फाऊंडेशन कडून कार्यकर्ते यांनी सर्व तयारी केली होती. भजनाचे कार्यक्रम सादर होणार असल्याने पावसाचा कोणताही त्रास भाविकांना जाणवू नये आणि विठनामाच्या गजरात कोणताही खंड पडू नये यासाठी मंडप घालण्यात आला होता.

भक्तांची गर्दी होणार हे लक्षात घेऊन नामवंत भजनी गायक यांचे कार्यक्रमांचे आयोजन केले होते. सकाळी सुचित्रा वांजळे यांच्या भजनाचा कार्यक्रम सादर झाला. संगीत शिक्षिका सुचिता वांजळे यांच्या कर्जत तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांचे महिला भजन मंडळाने त्या ठिकाणी अभंगवाणी सादर केली.

## महाडमध्ये अतिवृष्टीत पूल पाण्याखाली

### ■ पुलांच्या समस्येमुळे दळणवळणाला फटका

**। महाड । वार्ताहर ।**

अतिवृष्टीमध्ये महाड शहरासह तालुक्यातील अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण होते. पुराबरोबरच सातत्याने नैसर्गिक आपत्तीचे संकट ओढावते. शहरी व ग्रामीण भागात दळणवळणाचे साधन असलेल्या रस्त्यांवरील महत्त्वाचे चार पूल दरवर्षी अतिवृष्टीमध्ये पाण्याखाली जात असल्याने या भागातील जनजीवन सातत्याने विस्कळित होत आहे.

आपत्ती व्यवस्थापनामध्ये रस्ते, पूल अधिक महत्त्वाचे असतानाही आपद्ग्रस्त असलेल्या महाड तालुक्यात अशा पुलांची समस्या अद्यापही कायम आहे. महाड तालुक्यात सावित्री, गांधारी, काळ व नागेश्वरी या मुख्य नद्या आहेत. या नद्यांवर अनेक ठिकाणी वाहतुकीसाठी पूल बांधण्यात आले आहेत. पावसाळ्यात नद्यांचे पाणी वाढले की या पुलावरून पाणी जाते आणि वाहतूक व्यवस्था कोलमडते.

महाड शहर हे सावित्री, गांधारी नद्यांच्या किनारी असल्याने पावसाळ्यात दरवर्षी शहरात पुराचे पाणी येते, शिवाय नैसर्गिक आपत्तीचाही धोका बळावतो. अशा आपत्ती परिस्थितीमध्ये मदत कार्यासाठी रस्ते व पूल सुस्थितीत असणे व बारमाही वापरात असणे महत्त्वाचे आहे, मात्र आपत्कालीन व्यवस्थापनात या महत्त्वाच्या मुद्द्याकडे दुर्लक्ष होत आहे. सावित्री नदीवर शहरात असलेला दादली पूल शहराला इतर भागाशी जोडतो. महाड दापोली व मंडणगड, खाडीपट्टा, विन्हेरे या भागांना जोडणारा सावित्रीवरील दादली पूल अतिवृष्टीत पाण्याखाली जात असल्याने शहरातील संपर्क तुटतो. या पुलावरून पुराचे पाणी जात असल्याने शहरात पूर आला की या वाहतूक कोलमडते. पुलाजवळ नवीन पूल बांधण्याचे काम हाती घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

शहरातून महामार्गाला जोडणारा व कायम वर्दळीचा असलेला गांधारी नदीवरील ब्रिटिशकालीन पूल नेहमीच पाण्याखाली जातो. गतवर्षी हा पूल अवजड वाहतुकीला बंद करण्यात आला होता. शहरात येण्यासाठी हा जवळचा रस्ता आहे. केवळ शहरच नाही तर तालुक्यातील स्थितीही अशीच बिकट आहे. महाड-म्हाप्रळ मार्गावरील नागेश्वरी नदीवरील रावढळ पुलाची स्थितीही अनेक वर्षे तशीच आहे. या पुलावरूनही सातत्याने पाणी जात असते. त्यामुळे खाडीपट्टा, दापोली व मंडणगड या दोन तालुक्यामधील वाहतूक व्यवस्थेबरोबरच स्थानिक वाहतूक कोलमडते. याचा परिणाम दैनंदिन कामकाजावर होतो. हा रस्ता आता महामार्ग झाल्याने पूलही नव्याने बांधला जाणार आहे.दुर्गम भागातील मांघरुण-पंदेरी या प्रधानमंत्री सडक योजनेमधील मार्गावर पंदेरीचा कमी उंचीचा पूलही पाण्याखाली जातो.

## शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्याकडून शिवलकर कुटुंबियांचे सांत्वन

**। अलिबाग । वार्ताहर ।**

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी चौल येथील शिवलकर कुटुंबियांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन सांत्वनपर भेट घेतली. शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते अरविंद रघुनाथ शिवलकर यांच्या मातोश्री सुलोचना रघुनाथ शिवलकर यांचे ७ जुलै रोजी निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ९२ वर्षे होते.

सुलोचना रघुनाथ शिवलकर यांचे निधन झाल्याचे समजताच शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी अरविंद शिवलकर यांच्या चौल येथे राहत्या घरी जाऊन



सांत्वनपर भेट घेतली. यावेळी त्यांच्यासमवेत नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, चौल येथील शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते मधुकर काटकर, अनिल पाटील, द्वारकानाथ नाईक, आंबेपूरचे प्रकाश खडप, पप्पू पाटील, प्रशांत जाधव, रमेश नाईक, ओम प्रकाश पाटील आदी शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### महानायक अमिताभ बच्चन करणार वाचनाचा जागर

# शाळांमध्ये रंगणार महावाचन उत्सव

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये ‘महावाचन उत्सव २०२४’ हा उपक्रम २२ जुलै ते ३० ऑगस्ट या कालावधीत राबवण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांची सदिच्छादूत म्हणून निवड करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.**



शालेय शिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वाचन अत्यंत आवश्यक आहे. वाचनामुळे त्यांच्या अभ्यासाच्या गतीमध्ये वाढ होते. वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासात भर पडते. त्या अनुषंगाने राज्यातील सर्व शाळांमध्ये महाराष्ट्रातील वाचन चळवळ हा उपक्रम राबवण्याचा निर्णय २२ नोव्हेंबर २०२३ रोजी घेण्यात आला होता. या उपक्रमात ६६ हजार शाळा आणि ५२ लाख विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. रीड इंडिया सेलिब्रेशन या संस्थेच्या सहकार्याने हा उपक्रम घेण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये महावाचन उत्सव २०२४ हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वाचन संस्कृतीला प्रोत्साहन, विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करणे, मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृतीशी विद्यार्थ्यांची नाळ जोडणे, विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला आणि भाषा संवाद कौशल्याला चालना देणे, दर्जेदार साहित्य आणि लेखकांचा परिचय करून देणे, ही उद्दिष्टे समोर ठेवून ङ्गमहावाचन उत्सव २०२४फ हा उपक्रम राबवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांची उपक्रमाचे सदिच्छादूत म्हणून निवड करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. उपक्रमात तिसरी ते बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित आहे. त्यासाठी तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी, नववी ते बारावी असे तीन गट करण्यात आले आहेत. सहभागी सर्व विद्यार्थी वाचन केलेल्या पुस्तकावरील त्यांचे विचार लिखित आणि चित्रफितीच्या स्वरुपात महावाचन उत्सव २०२४च्या संकेतस्थळावर अपलोड करतील.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● शॉप भाडेने देणे आहे. आत २००sq.ft. आणि बाहेर २०० sq.ft.R.C.F. कॉलनी समोर, साळवी ऑटोचे शेजारी, भाडे -१०,०००/- ८२०८३७२०३०, ७७५८००३४५६

● Graduate candidates required for office in Alibag Call 9422383099 For interview between 11 am to 6 pm

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# लागू बंधूंचा नाविन्य उपक्रम

**। पनवेल । वार्ताहर ।**


पनवेलकरांसाठी खास लागू बंधू घेऊन येत आहेत रत्नांच्या दागिन्यांची विलक्षण, नजाकतपूर्ण, सुंदर, एकमेवाद्वितीय... अशी अनेक विशेषणेही ही कमी पडतील असे दागिने कधी पाहिले आहेत तुम्ही? नसतील तर लवकरच तुम्हाला सफर होईल अशाच विस्मयकारी दागिन्यांच्या दुनियेची. अहो म्हणजेच लागू बंधू ह्यांनी घडविलेल्या दागिन्यांच्या विश्वाची.

लागू बंधू ह्यांनी आजच्या घडीला ८८ यशस्वी वर्षे पूर्ण केली आहेत. तब्बल ८ दशकांपासून चालत आलेला ग्राहकांसाठी उत्तमोत्तम दागिने घडवण्याचा हा समृद्ध वारसा, लागू बंधूच्या आजच्या पिढीनेही नव्या तंत्रज्ञांच्या साहाय्याने कायम ठेवला आहे. लागू बंधूचे वैशिष्ट्यं म्हणजे, त्यांचे सर्वच संचालक दागिन्यांची उत्तम पारख असणारे जेमॉलॉजिस्टस आहेत. त्यांच्या कलाकौशल्याने आणि पारखी नजरेमधून घडलेला प्रत्येक दागिना हा अभिजाततेचा उत्कृष्ट नमुनाच असतो, असं म्हंटलं तरी वावगं ठरू नये.

असेच हे लागू बंधू घेऊन येत आहे रत्नांचे माहेर तेही पनवेल नगरीमध्ये. २० आणि २१ जुलै रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ८ दरम्यान रत्नांच्या सौंदर्याने नटलेले हे विश्व तुम्ही अनुभवू शकता हॉटेल सुरुची येथे. तुम्ही रत्नांचे माहेर ह्या प्रदर्शन व सेलमध्ये येऊन दागिन्यांच्या घडणावळीवर ७५ टक्क्यांपर्यंत सूट आणि सोन्याच्या जुन्या दागिन्यांवरती १०० टक्के एक्सचेंज व्हॅल्यू अशा आकर्षक ऑफर्सचा लाभही घेऊ शकता. तर मग सहकुटुंब आणि मित्रपरिवारासहित लागू बंधूंच्या ह्या रत्नांच्या माहेरला भेट द्या आणि अनुभवा नजराणा अभिनव कलात्मकतेचा!


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स**



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, खोपोली

**र.न.ई.-६४ (रायगड)**

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

जा.क्र. २३१/२०२४-२०२५ दि. १६/०७/२०२४

प्रति,
मा.श्री./श्रीमती.......................................................
...............................................................
महोदय/ महोदया,

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक ३०/०७/२०२४ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता संस्थेच्या बी. एल. पाटील तंत्रनिकेतन, खोपोली या महाविद्यालयाच्या हॉलमध्ये घेण्यात येणार आहे. कृपया सर्व सभासदांनी वेळेवर सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.
कळावे,

आपला विश्वासु,
सही/-
**(संतोष गु. जंगम)**
**अध्यक्ष खा.ता.शि.प्र. मंडळ खोपोली**

**सभेचे विषय :-**
१. मागिल सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. सन २०२३-२०२४ च्या अहवालास मान्यता देणे.
३. सन २०२३-२०२४ च्या ताळेबंदास व हिशोबास मान्यता देणे.
४. सन २०२४-२०२५ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
५. सन २०२४-२०२५ करिता संस्थेच्या लेखापाल यांची नियुक्ती करणे.
६. मा. अध्यक्षांच्या पुर्व संगतीने ऐनवेळी आलेल्या कामांचा विचार करणे.

**सुचना:-** १) गणसंख्ये अभावी वरील सभा तहकूब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी १० मिनीटानंतर होईल. सदर सभेला गणसंख्येचे बंधन असणार नाही.
२) स्थानिक वृत्तपत्रात सभेची नोटीस प्रसिध्द केलेली आहे. याची सभासदांनी नोंद घ्यावी. सभासदांना अहवालाची प्रत कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.
३) सभासदांना २०२३-२०२४ च्या ताळेबंदाची शेडयुल्स पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)

ज.म.र अर्ज १५/२०२३

### जाहिर नोटीस

प्रति,
श्री. राकेश रोहीदास म्हात्रे
रा. वनवली, पो. नागाव — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत खानाव,
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१. अर्जदार श्री. राकेश रोहीदास म्हात्रे यांचा मुलगा मनिष राकेश म्हात्रे यांचा जन्म दि. १९/५/२०१० रोजी राहत्या घरी मौजे खानाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथे झाला आहे.
२. जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत खानाव कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयांत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम ११(२) व (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.
३. मात्र यांचा जन्म नोंद ग्रामपंचायत खानाव येथे केलेली नसल्याने त्यांना जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत खानाव यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापुसान दि. १८/०७/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.
आज दि. १८/०७/२०२४ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

ठिकाण :अलिबाग — सही/-
तारिख : १८/०७/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## ग्रुप ग्रामपंचायत आपटा
### निविदा सूचना

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम |
|---|---|---|
| १) | जुना कोळीवाड्यातील शौचालयांना पाण्याची टाकी बसविणे व नळ कनेक्शन देणे | १,२०,०००/- |
| २) | मारुती सावंत ते काशीनाथ भोईर घराजवळ पाईप गटार बांधणे. | ४,००,०००/- |
| ३) | रामवाडी येथील शौचालय दुरुस्ती करणे. | ३३,५८१/- |
| ४) | अमरलाल सोनावले ते दुर्गवळे घरांपर्यंत गटार बांधणे. | ४,०९,४५०/- |
| ५) | आंबा शेलार ते परशुराम भोईर घरापर्यंत गटार बांधणे | २१३६४८.००/- |
| ६) | हरिभाऊ शेलार ते प्रदीप पाटील घरापर्यंत गटार बांधणे. | ३६००००.००/- |
| ७) | गंगेचीवाडी शाळा शौचालयाला पाण्याची टाकी बसवीणे | ५००००.००/- |
| ८) | अंगणवाडी क्र. १,२,४ येथे पाण्याची टाकी बसविणे. | १,२०,०००/- |
| ९) | आपटा बस स्टॉप येथील शौचालयाला पाण्याची टाकी बसविणे. | १,२०,०००/- |
| १०) | आपटा मोहल्ला येथील शौचालयाला नळ कनेक्शन देणे व पाण्याची टाकी बसविणे | १,२०,०००/- |

निविदा उघडण्याचा कालावधी - २६/०७/२४ सकाळी ११:३० वाजता

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे-**
१) अधिकृत ठेकेदारांनी कोरे निविदा संच दि. १९/०७/२०२४ ते २६/०७/२०२४ सुट्टीचे दिवस वगळता अर्ज करावेत नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
२) अर्जदारांनी सदर कोरे निविदा प्रपत्र दि. १९/०७/२४ ते २६/०७/२४ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळता ग्रामपंचायत कार्यालयात रोखीने फी भरून उपलब्ध होतील.
३) भरलेल्या निविदा दि. २६/०७/२४ रोजी सकाळी ९:३० ते ११.०० या वेळेत स्वीकारण्यात येतील व शक्यतो त्याच दिवशी सकाळी ११:३० वाजता उघडण्यात येतील.
४) इसारा रक्कम डिमांड ड्राफ्ट/रोखीने स्वीकारण्यात येईल ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत आपटा यांचे नावी असावा.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक अनुभवी ठेकेदारास प्राधान्य देण्यात येईल.
६) कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत रक्कम २% आयकर व १% इन्सुरन्स २% ह्या रकमा परस्पर वजावट केल्या जातील.
७) काम मंजूर झालेल्या निविदा धारकास रु. ५०० च्या स्टम्प पेपरवर करारनामा लिहून द्यावा लागेल.
८) सदरील काम पंचायत समितीकडील प्राप्त आराखड्यानुसार व ESTIMATE नुसार करायचे आहे.
९) सदरील काम पंचायत समितीकडील अभियंते व ग्रामपंचायतीच्या देखरेखीखाली करणेचे आहे.
१०) एक अगर सर्व निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**सही/-** — **सही /-**
**ग्रुप ग्रामपंचायत आपटा** — **ग्रुप ग्रामपंचायत आपटा**
**सरपंच** — **ग्रामविकास अधिकारी**

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**खुली ई-निविदा मागविणारी सूचना दिनांक 18.07.2024**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने, वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरीद्वारा खालील कामासाठी खुली ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहे. **अनु. क्र. 1: कामाचे नाव:** एईएन/कणकवली विभागांतर्गत विविध कटिंग्जमध्ये लूज स्केलिंग. (**निविदा क्रमांक:** केआर-आरएन-डब्ल्यू-2024-23). **अंदाजे मूल्य:** ₹ 19,55,044/- **ईएमडी:** ₹ 39,100/- **निविदा ऑन लाईन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ: 09/08/2024** रोजी **15.00 वा.**

**अनु. क्र. 2: कामाचे नाव:** एईएन/चिपळूण विभागांतर्गत विविध कटिंग्जमध्ये लूज स्केलिंग. (**निविदा क्रमांक:** केआर-आरएन-डब्ल्यू-2024-22). **अंदाजे मूल्य:** ₹ 13,64,716/-**ईएमडी:** ₹ 27,300/- **निविदा ऑन लाईन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ: 09/08/2024** रोजी **15.00 वा.**

अधिक माहितीसाठी क्षेत्रीय रेल्वे व्यवस्थापक, कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी कार्यालयाशी संपर्क करा. (**संकेतस्थळ: https://www.ireps.gov.in**)

## ग्रामपंचायत महलमिरा ता.पेण, जि.रायगड
### टेंडर नोटीस

ग्रुप ग्रामपंचायत महलमिरा कडून खालील काम करण्यासाठी जाहिर निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा उघडण्याची तारीख व वेळ |
|---|---|---|---|
| १ | ग्रुप ग्रामपंचायत म.मि.डोंगर आसाणी येथे व्यायामशाळा बांधणे. | ७,००,०००/- | २९/०७/२०२४ दुपारी २ वाजता |

**अटी व शर्ती**
१)अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल.
२)निविदा दि. १९ जुलै २०२४ ते २९ जुलै २०२४ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळेल./ निविदा फॉर्म २०० रूपये राहील.
३)कोणतीही एक किंवा सर्वच निविदा कोणतेही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार सर्वस्वी मा.सरपंच यांस असेल.
४)निविदा मंजूर झालेल्या ठेकेदारास रू. १०० चे बॉंडपेपर दोन जामिनदार देवून करारनामा स्वः खुशीने करून द्यावयाचा आहे.

**ग्रामविकास अधिकारी** — **सरपंच**
**ग्रामपंचायत महलमिरा** — **ग्रामपंचायत महलमिरा**
**ता.पेण, जि. रायगड** — **ता.पेण, जि. रायगड**

नोंदणी क्रमांक ४४४९/४.८.१९२४ जावक क्र.:७०२

### फक्त सभासदांसाठी सभेची नोटीस
### १०० वी वार्षिक सर्वसाधारण सभा
### सन २०२३ २०२४

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण, या संस्थेची सन २०२३-२०२४ सालची १०० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ०४/०८/२०२४रोजी आगरी समाज विकास मंच हॉल, पेण जि.रायगड येथे सकाळी ११.०० वाजता श्री. मोहन बाळाराम भोईर, चेअरमन- पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण, यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे तरी सदर सभेस सर्व सन्माननीय सभासदांनी उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**सभेपुढील कामे**
१)मागील दि.१०/०९/२०२३ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२)सन २०२३-२०२४ सालात अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
३)सन २०२३-२०२४ सालचा व्यवस्थापक मंडळाने शिफारस केलेला अहवाल, तेरीज, ताळेबंद, नफा तोटा पत्रके वाचून मंजूर करणे.
४)सन २०२३-२०२४ सालचा हिशेब तपासणी अहवालाचे वाचन करून नोंद घेणे.
५)नवीन पोटनियम दुरूस्तीस मान्यता देणे (पोटनियमांची शब्द योजना अहवालात समाविष्ट आहे).
६)सन २०२४-२०२५ या वर्षाकरिता वैधानिक लेखा परिक्षकाची नेमणूक करणे.
७)सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता अंतर्गत ऑडीटरची नेमणूक करणे व मानधन ठरवणे.
८) सन २०२३-२०२४ या सालातील नफा वाटणीस मंजुरी देणे.
९) सन २०२४-२०२५ या सालच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
१०) संस्थेच्या सन २०२४- २०२५ सालातील पेण व सर्व शाखांसह दुरूस्ती व इतर खर्चाच्या पुढील वर्षासाठिच्या अर्थसंकल्पास मंजूरी देणे.
११) शतसंवत्सरी शिल्लक रकमेच्या विनियोगासाठी योजना तयार करणेबाबत.
१२) मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय.

**विशेष सूचना**
१) सभेस आवश्यक ती गणपूर्ती न झाल्यास अर्धा तास सभा तहकूब ठेवण्यात येईल व त्या नंतर उपस्थितांच्या हजेरीतच त्याच ठिकाणी सभा घेतली जाईल, त्यावेळी गणपूर्तिची आवश्यकता असणार नाही.
२) सभासदांना काही माहिती हवी असेल अगर काही सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी त्या लेखी स्वरूपात
दि.२५/०७/२०२४ पर्यंत संस्थेच्या पेण येथील मुख्य कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पाठवाव्यात. त्यानंतर येणाऱ्या सूचना स्विकारल्या जाणार नाहीत.
३) संस्थेच्या या सभेस उपस्थित राहणाऱ्या सभासदांना प्रवास खर्च, अल्पोपहार व चहापाना करीता रोख रक्कम १०००/- रू
देण्यात येईल.
४)दिनांक ३ व ५ ऑगस्ट २०२४ या दिवशी शाखांसह कार्यालयीन कामकाज बंद राहील.
५)ज्या शिक्षण सेवक सभासदांचा कायमनिधी पगारातून येत नाही त्यांना उपस्थिती भत्ता दिला जाणार नाही.
६) ओळखपत्राशिवाय उपस्थिती भत्ता दिला जाणार नाही (फोटो असणारे कोणतेही ओळखपत्र आवश्यक).
**टिप :** संस्थेच्या शतक महोत्सवानिमित्त दिनांक ३ ऑगस्ट २०२४ रोजी होणाऱ्या सांस्कृतीक व शतक महोत्सवी कार्यक्रमास सभासदांनी उपस्थित रहावे, ही विनंती.
दिनांक : १९/०७/२०२४

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**

| श्री. नितिन वसंत वर्तक | श्री. सोपान रामचंद्र चांदे | श्रीमती.उज्वला जगन्नाथ कनोजे | श्री.मोहन बाळाराम भोईर |
|---|---|---|---|
| (सेक्रेटरी) | (मानद सचिव ) | (व्हा. चेअरमन) | (चेअरमन) |


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**

ई निविदा सूचना क्रमांक ६/२०२४- २०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा औद्योगिक क्षेत्रात फ्लो मीटरचा पुरवठा करून बसविणे व बूस्टर पंपाचे स्थान बदलून पुन्हा स्थापित करणे.(दुसरी मागणी) | ₹१२,१४,८९७.०० |
| २ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यादरम्यानची कामे करणे, रस्त्याच्या कडेला बांधलेले गटर, मोऱ्या व उघड्या गटरची साफसफाई करणे. (दुसरी मागणी) | ₹३९,९८,३५८.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १९/०७/२०२४ ते दिनांक २६/०७/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २२/०७/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/ महामंडळाचा खुलासा दिनांक २४/०७/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत तिचे मालक १) विलास वामन उतेकर २) अरुणा मधुकर पेरणेकर ३) अशोक वामन उतेकर ४) रामदास चिंधू उतेकर ५) रोहिदास चिंधू उतेकर ६) मच्छींद्र चिंधू उतेकर ७) पुष्पा विष्णू मांडे ८) मनीषा दिनेश कदम ९) सारिका मंगेश पवार १० ) कैलास नथुराम मोगल ११) कांचन अशोक मांडे १२) विजया गणेश मांडे १३) गोरखनाथ नथुराम मोगल १४) जयवंत नथुराम मोगल सर्वांचा पत्रव्यवहाराचा सध्याचा पत्ता १) द्वारा:अशोक वामन उतेकर, रा. सालपे, रोड, विठ्ठल मंदिरजवळ, कर्जत, सालपे, पिनकोड ४१०२०१ सध्याचा पत्ता २) द्वारा : जयवंत नथुराम मोगल, रेल्वे स्टेशनजवळ, मु. लौजी, पो. जगदीशनगर, ता. खालापूर पिनकोड ४१०२१५ यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन :-**

जिल्हा व तुकडी रायगड व पोटतुकडी व तालुका कर्जत मा. दुय्यम निबंधक, कर्जत यांचे क्षेत्राधिकारातील मौजे-सालपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे .आर-पॉ. | आकार रुपये - पैसे |
|---|---|---|---|
| १७ | ३/ब | जिरायत ०-३८-२० पोटखराब ०-०१-५० एकूण क्षेत्र ०-३९-७० पैकी खरेदी देत असलेले क्षेत्र ०-२०-०० | ५-१२ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, दान, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सूचना आहे.

दिनांक : १९ जुलै २०२४

**ॲड. प्रविण पुंडलिक कराळे**
बी.ए.एलएल.बी. अधिवक्ता
पत्ता: मु.बेकरे, पो.माणगांव,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०१०१
९९७५०९०३०४/९६०७५५६३१५
pravinkarale1992@gmail.com

# उच्चशिक्षित आर्किटेक्ट अतुल म्हात्रे

( पान ३ वरुन)

नारा देत नैना प्रकल्पाविरोधात शिवकर ग्रामपंचायतीचे आदर्श सरपंच, रायगडभूषण अनिल ढवळे, सामाजिक कार्यकर्त्या दमयंती भगत यांच्या नेतृत्वाखाली 'न भूतो न भविष्यती' असे १० दिवस बेमुदत उपोषण केले होते. यावेळी अतुल म्हात्रे यांनी उपोषणकर्त्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून शिष्टाई करून मोठी भूमिका पार पाडली होती. अतुल म्हात्रे यांनी विधान परिषदेचे आमदार भाई जयंत पाटील यांच्या माध्यमातून शिवसेनेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे व इतर आमदारांच्या नागपुरात जाऊन भेटीगाठी घेतल्या आमदार भाई जयंत पाटील, आमदार अंबादास दानवे यांना नैना प्रकल्प बाधीत शेतकऱ्याच्या व्यथांची, प्रश्नांची सखोल माहिती दिली. त्यामुळे आमदार भाई जयंत पाटील, आमदार अंबादास दानवे यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात विधी मंडळाच्या सभागृहात नैना विरोधात जोरदारपणे आवाज उठवला, शेतकऱ्यांची प्रभाविपणे बाजु मांडली आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच महाराष्ट्र शासनाला नैनाबाधित क्षेत्रात युडीसीपीआर एकात्मक प्रणाली अंमलात आणण्यास भाग पाडले आहे. अतुल म्हात्रे यांच्या या यशस्वी प्रयत्नांमुळेच १० दिवस लांबलेल्या शेतकऱ्यांच्या बेमुदत उपोषणाची अखेर यशस्वी सांगता झाली. आर्किटेक्ट अतुल म्हात्रे यांनी २०१३ पासून नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट नॉटीफाय एरिया (नैना) क्षेत्र बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी व नैनाबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती करण्यासाठी पनवेल-उरण-खालापूर तालुक्यांत गावोगावी बैठका घेतल्या आहेत. सिडको, नैना विरोधात एक तत्विका भूमिका घेऊन आंदोलने, मोर्चे काढून अतुल म्हात्रे यांनी सिडको, नैनाने घेतलेले चुकीचे निर्णय या प्राधिकरणाच्या सक्षम अधिकाऱ्यांना बदलायला भाग पाडले आहे. पनवेल तालुक्यातील चिंध्रण या गावातील मुंबई ऊर्जाच्या प्रकल्पात स्थानिक शेतकऱ्यांच्या ७० ते ८० एकर जमिनी या प्रकल्पात बाधित होणार होत्या. शिवाय या जमिनीला अत्यल्प मोबदला मिळणार असल्याने शेतकरी उद्ध्वस्त होणार होते. इथल्या शेतकऱ्यांनी, भूमिपुत्रांनी ९५ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष, कामगार नेते, ॲड. सुरेश ठाकूर, ॲड. प्रियांका ठाकूर, अनिल ढवळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष किरण कडू यांच्या नेतृत्वाखाली मुंबई ऊर्जा प्रकल्पाविरोधात आंदोलन, उपोषण सुरू केले. या आंदोलनात सहभागी होऊन अतुल म्हात्रे यांनी मुंबई ऊर्जा प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना योग्यते मार्गदर्शन केले आणि शेतकऱ्यांच्या जमिनितून जाणारा हायटेन्शन टॉवरचा मार्ग सरकारी जमिनितून नेण्यास मुंबई ऊर्जा प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना भाग पाडले. त्याचबरोबर मुंबई ऊर्जा प्रकल्पाकडून बाधित शेतकऱ्यांना, भूमिपुत्रांना करोडो रूपयांचा मोबदला मिळवून देण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. अशी आर्किटेक्ट अतुल म्हात्रे यांच्या नेतृत्वात अशक्य ते शक्य करण्याची जादुई किमया आहे.

पनवेल तालुक्यातील प्रस्तावित वसई-विरार कॉरिडॉर या रस्त्यामध्ये सांगडे, बोर्ले या गावातील शेतकऱ्यांची घरे उद्ध्वस्त होत असताना या गावातील सामाजिक कार्यकर्ते सुरेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या बाधित शेतकऱ्यांच्या शेकडो हरकती एमएसआरडीसी प्राधिकरणाकडे नोंदवून अतुल म्हात्रे यांनी एमएसआरडीसीच्या सक्षम अधिकाऱ्यांशी यशस्वी चर्चा केली आणि नियोजित रस्त्याचा मार्ग बदलण्याचा यशस्वी प्रयत्न करून या रस्त्यामध्ये येणारी शेतकऱ्यांची उद्ध्वस्त होणारी घरे वाचविण्याचा पराक्रम अतुल म्हात्रे व सुरेश पवार यांनी केला आहे. पेण तालुक्यातील ८८ गावे नैना प्रकल्पातून वगळण्यासाठी अतुल म्हात्रे यांनी यशस्वी प्रयत्न केले आहेत. पनवेल तालुक्यातील ६ गावातील जमिनी एमएमआरडीए संपादित करीत असलेल्या शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचे कार्य अतुल म्हात्रे करीत आहेत. पेण तालुक्यातील गडब येथे होऊ घातलेल्या एमआयडीसीसाठी शेतकऱ्यांच्या, भूमिपुत्रांच्या जमिनी महाराष्ट्र सरकार अत्यल्प मोबदला देऊन लाटत असल्याचे निदर्शनास आल्यावर अतुल म्हात्रे यांनी सरकारच्या धोरणाबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचे काम सुरू केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा पदस्पर्श झालेल्या 'पेण' तालुक्याचे भूमिपुत्र असल्याचा सार्थ अभिमान बाळगणाऱ्या; पेण तालुक्याच्या सर्वांगिण विकासाचे स्वप्न पाहणाऱ्या आर्किटेक्ट अतुल म्हात्रे यांनी आपल्या ज्ञानाचा, शिक्षणाचा, अनुभवाचा उपयोग समाजासाठी, शेतकऱ्यांना, भूमिपुत्रांना सुखी करण्याचा मनाशी निश्चय केला आहे.

आज 'पेण' तालुक्यासमोर अनेक प्रश्न 'आ' वासून उभे आहेत. हे सारे प्रश्न शेतकऱ्यांच्या, भूमिपुत्रांच्या, कार्यकर्त्यांच्या सहकार्याने, पाठिंब्याने मार्गी लावण्यासाठी आर्किटेक्ट अतुल म्हात्रे पुढे सरसावले आहेत. पेण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनीतून जाणाऱ्या अलिबाग-विरार मल्टीमॉडेल कॉरीडॉर प्रकल्पामुळे असंख्य शेतकरी बाधीत होणार आहेत. या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य तो मोबदला मिळवून देण्यासाठी आर्किटेक्ट अतुल म्हात्रे प्रयत्न करणार आहेत.

पेण तालुक्यात मोठ्या संख्येने बेरोजगार आहेत. पेणमधील जेएसडब्ल्यु स्टील कंपनीसारख्या प्रकल्पात स्थानिक भूमिपुत्रांना डावललं जात आहे. या प्रकल्पामुळे पेण परिसरात प्रदूषणाची समस्या निर्माण झाली आहे. पेणमधील धरमतर खाडीत जेएसडब्ल्यु स्टील कंपनी करीत असलेल्या प्रदूषणामुळे खाडीतील मत्स्योत्पादनावर त्याचा दुष्परिणाम होत आहे. या परिसरातील मच्छिमार कोळी बांधवांचा रोजगार बुडाला आहे. धरमतर खाडीत झालेल्या प्रदूषणामुळे मत्स्योत्पादनाबरोबर या खाडीला लागून असलेल्या समुद्रस्तरीय भातशेतीत प्रदूषित खाडीचे पाणी शिरत असल्याने शेतीही संपुष्टात आली आहे. प्रदूषित पाण्याचा, हवेत वाढणाऱ्या प्रदूषणाचा एक मोठा प्रश्न आहे. नागोठणे येथील रिलायन्स केमिकल्स कंपनीतील प्रदूषित पाणी कोणतीही प्रक्रिया न करता पेण तालुक्यातील शिहू, झोतिरपाडा परिसरातील खाडीत सोडले जात असल्याने या परिसरातील शेतकऱ्यांच्या व कोळी भूमिपुत्रांच्या उदरनिर्वाहाचे साधन नष्ट झाले आहे. या खाडीला लागून असलेल्या समुद्रस्तरीय भातशेतीत प्रदूषित खाडीचे पाणी शिरत असल्याने या परिसरातील शेतकऱ्यांची शेती संपुष्टात आली आहे. चिमण्यांतून आग ओकणारी रिलायन्स कंपनी करीत असलेल्या प्रदूषणामुळे या परिसरातील हवा प्रदूषित झाली आहे. या हवेमुळे शेतकऱ्यांना श्वसनाचे आणि त्वचेच्या अनेक रोगांनी ग्रासले आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. या परिसरातील वृक्षांवर, वनांवर याचा वाईट परिणाम होत आहे. या भागातील निसर्ग वाचविण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे. रिलायन्स कंपनीने पाण्यात सोडलेल्या रसायनांमुळे गोड्या पाण्याचे स्त्रोत प्रदूषित झाले आहे. या परिसरात रिलायन्स कंपनीने केलेल्या प्रदूषणाचा मोठा प्रश्न आहे. रिलायन्स केमिकल्स कंपनीत काम मिळविण्यासाठी उत्सुक असलेल्या तरूण स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार मिळत नाही अशी स्थानिक बेरोजगारांची तक्रार आहे. रिलायन्स केमिकल्स कंपनीचा बेरोजगारांचाही मोठा प्रश्न आहे. पेण परिसरातील डोंगरदऱ्यात आदिवासी वाड्या, वस्त्या आहेत. या वाड्यावस्त्यांतून मोठ्या संख्येने आदिवासी राहत आहेत. आज आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्याला ७५ वर्षे झाली आहेत. पण, तरीही या स्वातंत्र्याची फळे या मूलनिवासी आदिवासी समाजाला आजपर्यंत चाखायला मिळालेली नाहीत. या आदिवासी वाड्या वस्त्यांतील मुले, मुली मोठ्या संख्येने आज बेरोजगार आहेत. आदिवासींना रोजगार नाही, त्यामुळे आदिवासी कष्टात जीवन जगत आहेत. आदिवासींसाठी असलेल्या शासनाच्या अनेक योजना आहेत, या योजनांच्या माध्यमातून आदिवासींना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करायला पाहिजेत. याची अतुल म्हात्रे यांना जाणीव आहे. शासनाच्या घरकुल योजनेच्या माध्यमातून पेण तालुक्यातील आदिवासींच्या घरांचा प्रश्न अतुल म्हात्रे सोडविण्याचा प्रयत्न करणार आहेत.

पेण हे मुंबई आणि कोकणात जाणाऱ्या प्रवाशांचे महत्वाचे ठिकाण आहे. पण पेण एसटी बस स्टॅन्डची झालेली दुरवस्था पाहून या बसस्टॅन्डची दुर्दशा कधी संपणार असा प्रश्न प्रवाशांना सतावत आहे. पेण एसटी बस स्टॅन्डमध्ये येणाऱ्या प्रवाशांचे पायाभूत सेवा-सुविधांच्या अभावामुळे होणारे हाल, गैरसोय हाही पेणकरांसमोर महत्वाचा प्रश्न आहे. अशीच काहीशी परिस्थिती पेणच्या रेल्वे स्थानकाची झालेली आहे.

पेण रेल्वेस्थानक मुंबई-रत्नागिरी, गोवा मार्गावरील महत्त्वाचे रेल्वेस्थानक आहे. पण या रेल्वेस्थानकात प्रवाशांना देण्यात येणाऱ्या सेवा-सुविधांचा अभाव आहे. पेण रेल्वे स्थानक परिसरात रानटी झाडे वाढली आहेत. पेण रेल्वे स्थानकाचे सुशोभिकरण करून सर्व सेवा-सुविधांनी सुसज्ज सुंदर रेल्वे स्थानक करण्याची मागणी प्रवासी वर्ग करीत आहे. पेण एसटी बस स्टॅन्ड आणि रेल्वे स्थानकांत प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी अतुल म्हात्रे प्रयत्न करणार आहेत.

इंदापूर-पनवेल मार्गावरील खारेपाटातील लोकांना जाण्या-येण्यासाठी जोडणारा रस्ता वाशी नाका या नावाने प्रसिध्द आहे. या ठिकाणी सब-वे होणे आवश्यक आहे. या ठिकाणी शेकडो युवकांना अपघात झाल्याने प्राण गमवावे लागले आहे. हीदेखील मोठी समस्या सोडविणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे पनवेल-इंदापूर मार्गावर कोलेटी, नागोठणे या ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. हाही प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न अतुल म्हात्रे करीत आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात अंतोरे ाडीवरील बंदरातून सागरी व्यापार चालत असे. छत्रपती शिवाजी महाराजांची आरमारी जहाजे अंतोरे बंदरात (खाडीत) उभी रहात असत. असा इतिहास असलेल्या अंतोरे, रावे, दादर खाडीतून स्वातंत्र्यपूर्व काळात शिडाच्या मचव्यांतून प्रवासी वाहतूक, व्यापारी वाहतूक सुरू होती.

हमरापूर परिसरातील गणपतीच्या मूर्त्या, खारेपाटातील मिठाचा व्यापार, प्रवाशांची जलवाहतूक मुंबई व इतर ठिकाणी शिडाच्या मचव्यांतून होत होती. अंतोरे, रावे, दादर खाडीतून पुन्हा प्रवासी वाहतूक, व्यापारी वाहतूक सुरू करण्यासाठी आर्किटेक्ट अतुल म्हात्रे प्रयत्न करीत आहेत. अंतोरे, रावे, दादर खाडीतून पर्यावरणस्नेही जलवाहतूक सुरू झाल्यास खारेपाटातून मुंबईकडे रस्त्याने वाहतूक करणाऱ्या सेवांवरील ताण कमी होईल. या जलवाहतुकीला पुन्हा सुवर्ण दिवस येतील. या जलवाहतुकीमुळे इथल्या बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होईल.वाक्रुळ येथील हेटवणे धरणातील पाणी पेण तालुक्यातील खारेपाटातील वाशी, शिर्की, वढाव-वडखळ, शिर्की-मसद, बोरी पट्टा, डोलवी, गडब, कासू, पांडापूर, कोलेटीपर्यंत तसेच हमरापूर, कळवे, जोहा, दादर या विभागातील ५२ गावे सिंचनाखाली आणण्यासाठी आर्किटेक्ट अतुल म्हात्रे प्रयत्न करणार आहेत. हेटवणे धरणातील पाण्याने खारेपाटातील ५२ गावे सिंचनाखाली आणली तर ही गावे सुजलाम् सुफलाम् होतील. या पाण्यावर दुबार पिके घेऊन इथला शेतकरी कष्टकरी सुखी होईल, समृध्द होईल. अनेक वर्षांपासून स्थानिक राजकीय पक्षांच्या राजकारणामुळे या भागात राहणाऱ्या ग्रामस्थांचे पाण्यासाठी होणारे हाल संपुष्टात येतील. हेटवणे धरणाच्या पाण्याचा हा मोठा प्रश्न सोडविण्यासाठी अतुल म्हात्रे प्रयत्न करीत आहेत. असे अनेक प्रश्न आपल्या अभ्यासाने, अनुभवाने, कौशल्याने सोडविण्यासाठी नव्या दमाचे, उदयोन्मुख तरूण नेतृत्व उच्चशिक्षित आर्किटेक्ट अतुल म्हात्रे यशस्वी होतील, असा विश्वास पेण परिसरातील शेतकरी, भूमिपुत्र, कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत.

निवडक

## साराचे बॉलिवूडमध्ये पदार्पण?

**मुंबई :** सचिन तेंडुलकरची मुलगी सारा तेंडुलकर बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे का? अलीकडेच तिचा एक व्हिडिओ समोर आला, त्यानंतर सोशल मीडियावर ही चर्चा सुरू झाली. सारा यापूर्वीही अनेक जाहिराती आणि मॉडेलिंग प्रोजेक्टमध्ये दिसली आहे. आता तिचा एक व्हिडिओ समोर आला असून एका व्हिडीयोत मुंबईतील पाली हिल परिसरात निळ्या रंगाच्या ड्रेसमध्ये सुंदर दिसत होती. तर, दुसऱ्या व्हिडिओमध्ये ती स्टुडिओबाहेर व्हॅनिटी व्हॅनकडे जाताना दिसली. हे आता साराही हिरोईन बनणार असल्याचे बोलले जात आहे.

## स्टुअर्ट ब्रॉडचा सन्मान

**लंडन :** वेस्ट इंडिजचा संघ इंग्लंड दौऱ्यावर असून कसोटी मालिका खेळत आहे. या मालिकेतील दुसरा सामना नॉटिंगहॅममधील ट्रेंट ब्रिज येथे होत असून या सामन्यापूर्वी इंग्लंडचा माजी क्रिकेटपटु स्टुअर्ट ब्रॉड याचा मोठा सन्मान होत आहे. ट्रेंट ब्रिज येथील पॅव्हेलियन एंडला त्याचे नाव देऊन त्याला सन्मानित करण्यात येत आहे. खरंतर हा निर्णय त्याच्या निवृत्तीनंतर लगेच घेण्यात आला होता, पण त्याच्या पॅव्हेलियन एंडला देण्यात येणाऱ्या त्याच्या नावाचे उद्घाटन सामन्याच्या पहिल्या दिवसाआधी आयोजित करण्यात आला आहे.

## टीकाकारांचा डोळेझाकपणा

**नवी दिल्ली :** पॅरिस ऑलिंपिकमध्ये भारतीय खेळाडूंनी पदकांची लयलूट करावी, यासाठी त्यांच्यासाठी वैयक्तिक प्रशिक्षक, फिजिओथेरेपिस्ट, मानसोपचारतज्ज्ञांची निवड करण्यात आली आहे. १३ जणांची स्पोर्टस् सायन्सची टीमही सज्ज आहे. डॉ. दिनशॉ परडीवाला यांच्या मार्गदर्शनाखाली ही टीम कार्यरत राहणार आहे. खेळाडूंना मदत करण्याचा सर्वोत्तम प्रयत्न केला जात आहे. टीकाकार या बाबींकडे डोळेझाकपणा करीत आहेत, अशा शब्दांत ऑलिंपिक संघटनेच्या अध्यक्षा पी.टी. उषा यांनी मत व्यक्त केले.

## ऑलिंपिकला भारतीय सुरक्षा

**नवी दिल्ली :** पॅरिस ऑलिंपिकला भारतीयांचे सुरक्षा कवच असणार आहे. केंद्रीय सशस्त्र पोलिस दल व विशेष कमांडो श्वान पथक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पॅरिस ऑलिंपिकचा दहशतवादी व हाणामारी करणाऱ्यांपासून बचाव करण्यासाठी ही निवड करण्यात आली आहे. ऑलिंपिकच्या स्पर्धा, शर्यती जिथे होणार आहेत, तिथे पोलिस दलातील जवान व श्वान तैनात करण्यात येणार आहेत, अशी माहिती अधिकृत सूत्रांकडून देण्यात आली. यावेळी दहा श्वान पथकांचा संघ पॅरिस ऑलिंपिकसाठी सज्ज झाला आहे.

## पॅरिसमध्ये ‘इंडिया हाऊस’

**नवी दिल्ली :** भारताचा ११७ खेळाडूंचा चमू पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत पदाकांसाठी मैदानावर उतरणार आहे. २६ जुलैपासून सुरू होणारी ही ऑलिम्पिक स्पर्धा भारतासाठी आणखी एका गोष्टीमुळे खास असणार आहे. ते म्हणजे भारतीयांचे हक्काचे ‘इंडिया हाऊस’. इंडिया हाऊसही भारतासोबतच देशाची गेल्या काही वर्षांतील उत्क्रांती आणि विकास जगाला दाखवण्याची संधी असेल. कंट्री बेस हाऊसची संकल्पना पहिल्यांदा १९९२ मध्ये बार्सिलोना ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये सुरू झाली होती.

### गतका मार्शल आर्ट राज्यस्तरीय चॅम्पियनशिप स्पर्धा

# रायगडच्या मुलांची ‘सुवर्ण’ कामगिरी



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**नुकत्याच संपन्न झालेल्या सातारा स्पोर्ट कॉम्प्लेक्स येथील गतका मार्शल आर्ट या राज्यस्तरीय चॅम्पियनशिपमध्ये रायगड जिल्हा तिसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला आहे. या स्पर्धेसाठी राज्यभरातून २७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.**

गतका मार्शल आर्ट स्पर्धेमध्ये रायगड मधील सहभागी खेळाडूंमधील पेण येथील दिया विजय म्हात्रे व सेजल दशरथ म्हात्रे हिने सुवर्णपदक पटकावले आहे. खोपोली येथील काव्य शेलार, आरुषी अमोल चौधरी, स्वरा स्वप्निल देशमुख, मालविका सुदेवान लहुजी व अपूर्वा कातोरे यांनी सुवर्णपदक तर हर्षद अरुण गौड व श्रुतीक संतोष गौड यांनी रौप्यपदक पटकावले आहे.

अलिबाग मधील वेदिका संतोष कवळे, सोनू नरेश कामी, तन्मयी सुधीर पाटील, मानसी प्रदीप पाटील, प्रणाली बाबासाहेब कांबळे, श्रमिका श्रीधर पाटील, पूर्वा रवींद्र म्हात्रे, जिज्ञासा सुधीर पाटील पेढांबे, किंजल निवास टिवलेकर, स्वरा प्रयाग वारगे, सेजल सचिन पाटील, सानवी संदीप राऊत व आर्य शैलेश माळी यांनी सुवर्णपदक तर तनया किरण मंचेकर, विराट वैभव पाटील यांनी रौप्य पदक पटकावले असून जिज्ञा अजित वर्तक व अंश आल्हाद नाईक यांनी कांस्यपदक पटकावले आहे. याव्यतीरिक्त शौर्य मनोज जावळेने या स्पर्धेत उत्स्फुर्त सहभाग नोंदवला असून अर्णव संतोष डुकरे चौथा क्रमांकाचा मानकरी ठरला. तर, रियार्थ निलेश म्हात्रे व नील जगदीश घरत यांनी उत्कृष्ट प्रदर्शन केले.

यावेळी रायगडच्या संघाबरोबर मॅनेजर विश्वजीत पाटील तसेच प्रशिक्षक रोहन गुरव, काजल पाटील, रजिता गौंड होत्या. तसेच, जिल्हा संघटनेचे अध्यक्ष संतोष कवळे हे देखील मुलांच्या सोबत होते. या विजयी स्पर्धकांची २४ ते २७ ऑगस्ट पंजाबमध्ये राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली असून रायगडचे खेळाडू महाराष्ट्राच्या संघातून नेतृत्व करणार आहेत. या सर्व विजयी स्पर्धकांचे जिल्हा संघटनेचे कार्याध्यक्ष नयना शिलधनक यांच्याकडून तसेच संपुर्ण रायगडातून कौतुक होत आहे. तसेच, त्यांच्या पुढच्या वाटचालीसाठी शुभच्छा देण्यात आल्या.

## उत्कृष्ट पंच म्हणून काटकर यांचा सन्मान



**। पाली । वार्ताहर ।**

डायरेक्ट व्हॉलीबॉल चॅम्पियनशिप स्पर्धेत राष्ट्रीय पंच म्हणून सुधागड तालुक्यातील पाली येथील विजय काटकर यांची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये त्यांनी उत्कृष्ट पंच म्हणून कामगिरी केल्याबद्दल त्यांचा आयोजकाकडून सन्मान करण्यात आला.

राष्ट्रीय डायरेक्ट व्हॉलीबॉल चॅम्पियनशिप स्पर्धा २०२४ ही १२ आणि १३ जुलै रोजी भोपाळ येथे संपन्न झाली होती. या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून खेल युवा कल्याण मंत्री विश्वास कैलास सारंग, राष्ट्रीय डायरेक्ट व्हॉलीबॉलचे कार्यकारणी अध्यक्ष बिपिन चेहेल, उपाध्यक्ष बि.डी. साळुंखे, दीपक मोकल, अफरोज खान, रोहित सिंह आदी उपस्थित होते. या स्पर्धत एकूण १३ पंच आणि १६ राज्याचे संघ सहभागी झाले होते. ही स्पर्धा बोनी पोलीस स्कूल भोपाळ येथे पार पडली. यामध्ये उत्तर प्रदेश संघाने प्रथम क्रमांक तर पंजाबने द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

## तांबडकर यांना रेंन्शी पदवी बहाल



**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील कराटे प्रशिक्षक मास्टर अभिषेक गजानन तांबडकर यांना त्यांच्या कराटे क्षेत्रातील यशस्वी कारकीर्द व कौशल्य आधारे ओकिनावा शोरीन रियू कराटे डो, उडेन टी कोबुजुत्सू असोसिएशन यांच्यावतीने पाचवी डिग्री रेंन्शी बेल्ट व पदवी देऊन सन्मानित करण्यात आले.

केरळ येथील सुल्तान बथेरी ओकिनावा शोरीन रियू कराटे असोसिएशनच्या मुख्यालयात नुकतेच विशेष प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले. यामध्ये ग्रँड मास्टर हन्शी के.पी. रविंद्रन (आशिया खंड प्रमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या प्रगत शिबिरात असोसिएशन यांच्यावतीने त्यांची प्रात्यक्षिके तपासून व त्यांची कराटे क्षेत्रातील प्रदिर्घ यशस्वी कारकिर्द पहाता त्यांना ५ वी डिग्री रेंन्शी बेल्ट व पदवी प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल क्योशी विजय चंद्रकांत तांबडकर व असंख्य चाहत्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## कामोठ्यात योगासन स्पर्धेचे आयोजन

**। पनवेल । वार्ताहर ।**

महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या मान्यतेने व रायगड जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशनच्यावतीने २८ जुलै रोजी कामोठे येथील राधाई इन्कसॅप स्कूल येथे जिल्हास्तरीय अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत सब ज्युनिअर गट मुलं-मुली (१० ते १४ वयोगट), ज्युनिअर गट मुलं-मुली (१४ ते १८ वयोगट), सीनियर गट मुलं-मुली (१८ ते २८ वयोगट), सीनियर ‘अ’ गट महिला-पुरुष (२८ ते ३५ वयोगट), सीनियर ‘ब’ गट महिला-पुरुष (३५ ते ४५ वयोगट) आणि सीनियर ‘क’ गट पुरुष-महिला (४५ ते ५५ वयोगट) असे सहा गट पाडण्यात आले आहेत. या स्पर्धेत पारंपरिक योगासन, आर्टिस्टिक सिंगल, आर्टिस्टिक पेअर, रिदमिक पेयर या प्रकारात स्पर्धा घेण्यात येणार आहेत. प्रत्येक वयोगटातील अव्वल तीन स्पर्धकांची निवड संगमनेर येथे १५ ते१८ ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी होईल.

स्पर्धेविषयी अधिक माहितीकरिता उत्तम मांदारे ८७७९६२८८५१, हेमंत पयेर ९८६०६०१७३६ व सागर सावंत ९८२०९४६५९४ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन रायगड जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशनच्यावतीने करण्यात आले आहे.

## टी-२० कर्णधारावरून वाद



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाचा पुढील नियमीत टी-२० कर्णधार कोण असणार? या प्रश्नाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. दरम्यान, भारतीय क्रिकेटशी संबंधित एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. अहवालानुसार, भारताच्या पुढील टी-२० कर्णधारावरून वाद सुरू आहे. बीसीसीआयचे सचिव जय शाह आणि नवे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यात मतभेद असल्याचे सांगण्यात येत आहे.एका अहवालात हार्दिकला कर्णधारपद मिळणार नसल्याचा दावा करण्यात आला आहे. तर, सूर्यकुमार यादव हा नवा कर्णधार होण्याचा सर्वात मोठा दावेदार आहे. परंतु, बीसीसीआय सचिव जय शाह यांना हार्दिक पांड्याने टी-२० संघाची जबाबदारी सांभाळावी अशी इच्छा आहे. मात्र, गौतम गंभीर यासाठी तयार नाही. टी-२० संघाची धुरा सूर्यकुमार यादवकडे सोपवावी, अशी गंभीरची इच्छा आहे. याबाबत दोघांमध्ये मतभेद असल्याचे निदर्शनास आले आहे.

## आरडीसीएकडून स्पर्धेसाठी नोंदणी करण्याचे आवाहन

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या नवनिर्वाचित कार्यकारणीची सभा नुकतीच खोपोली येथील महाराजा बँक्वेट हॉल येथे पार पडली. या सभेत आगामी २०२४-२५ च्या क्रिकेट हंगामासाठी विविध वयोगटातील मुला-मुलींसाठी क्रिकेट स्पर्धेचा आराखडा तयार करण्यात आला.

जिल्ह्याच्या संघाची निवडचाचणी स्पर्धात्मक स्वरूपात व्हावी यासाठी जिल्हा क्रिकेट असोसिएशन प्रयत्नशील आहे. स्पर्धा घेताना त्याचे पूर्वनियोजिन, स्वरूप व प्रत्येक्ष मैदानावरचे आयोजन व्हावे, यासाठी सभेमध्ये चर्चा करण्यात आली. प्रत्येक वयोगटात जिल्ह्यातील निश्चित किती संघ सहभागी होतील व त्यासाठी जिल्हा क्रिकेट असोसिएशनला स्पर्धेच्या तारखा, मैदाने, पंच, स्कोअरर्स व निधीची तरतूद करता यावी म्हणून अकॅडमी, क्लब व संघांना आपल्या स्पर्धेसाठी विविध वयोगटात निश्चित सहभाग घेण्यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदिप नाईक यांच्याकडून करण्यात आले आहे. ही स्पर्धा नोंदणी ऑनलाईन गुगल फॉर्म द्वारे ३१ जुलैपर्यंत करता येणार असून अधिक माहितीसाठी प्रदिप खलाटे ८७६७९५९९६२, ॲड. पंकज पंडित ८१४९२५२८२९, शंकर दळवी ९४२२५९४१४१ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी आरडीसीए कार्यकारणीच्या सभेसाठी अध्यक्ष अनिरुद्ध पाटील,सचिव प्रदिप नाईक, सदस्य यशवंत साबळे, जयंत नाईक, प्रशांत ओक, संतोष भोईर, राजेश पाटील, संदीप पाटील, कौस्तुभ जोशी, सतिष पाटील, अँड.पंकज पंडित, प्रदिप खलाटे आदी उपस्थित होते.

RAIGAD DISTRICT CRICKET ASSOCIATION

## ‘तिमिरातूनी तेजाकडे’ स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन




**। खोपोली । प्रतिनिधी ।**

कला, क्रीडा, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आर्यन फ्रेंड्स फाऊंडेशन यांच्यावतीने ‘तिमिरातून तेजाकडे’ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच वडवळ येथील श्री शिव छत्रपती सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमाला शंभरहुन अधिक विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली होते.

ग्रामीण भागातील मुलांना अश्या प्रकारचे मार्गदर्शन पहिल्यांदाच होत असल्याने विद्यार्थी, पालक तसेच उपस्थित मान्यवरांनी आर्यन्स फ्रेंड्स् फाऊंडेशनचे अध्यक्ष जगदीश मरागजे तसेच कार्यकारिणी पदाधिकारी महेंद्र सावंत, सुधीर मुसळे, प्रमोद सावंत, प्रवीण सावंत, मंगेश सावंत, सागर मोरे व सचिन जाधव यांचे कौतुक केले. यावेळी अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघाचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, सरपंच ज्ञानेश्वर सुतार, श्यामकांत सावंत, एम.डी. चाळके, जितेंद्र सकपाळ, विष्णू सावंत, सुरेश चाळके, संजय कदम, जगदीश मरागजे, प्रमोद पाटील, वैशाली गोळे, सुधाकर थळे आदी मान्यवर उपस्थित होते.

### ‘सतेज करंडक’ पुरूष व महिला कबड्डी स्पर्धेचा थरार

# महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी

**७१ व्या महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या पुरुष व महिला गटाच्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी पुरुषांच्या सामन्यात नंदुरबार, पुणे शहर, पुणे ग्रामीण व अहमदनगर संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. तर, महिलांच्या सामन्यात पुणे ग्रामीण, पिंपरी चिंचवड, पुणे शहर, सातारा, मुंबई उपनगर (प), मुंबई शहर (प), नंदुरबार, पालघर या संघानी विजय मिळविले.**



**। पुणे । प्रतिनिधी ।**

बाणेर येथील बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशन व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या संयुक्तविद्यमाने श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे ७१ व्या महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या स्पर्धा पार पडत आहेत. या स्पर्धेतील पुरुष गटाच्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी ‘सतेज करंडक’ स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी पुरुषांच्या पहिल्या उपांत्य पुर्व फेरीच्या सामन्यात नंदुरबार संघाने कोल्हापूर संघावर ३१-२४ अशी मात करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. दुसऱ्या सामन्यात पुणे शहर संघाने तुल्यबळ पालघर संघावर ६०-४४ अशी मात करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला. मध्यंतराला पुणे शहर संघाकडे ३०-२१ अशी आघाडी होती.

यानंतर अत्यंत अटितटीच्या तिसऱ्या सामन्यात पुणे ग्रामीण संघाने मुंबई उपनगर पुर्व संघावर ३७-३३ अशी मात केली. मध्यंतराला पुणे ग्रामीण संघ ९-१८ असा पिछाडीवर होता. मात्र, पुणे ग्रामीण संघाच्या अजित चौहान, तेजस काळभोर, अक्षय सुर्यवंशी यांनी मध्यंतरानंतर जबरदस्त आक्रमक खेळ करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. हा सामना निर्धारित वेळेत २९-२९ अशा समान गुणांवर संपला. त्यामुळे हा सामना पाच-पाच चढायांवर खेळला गेला. पाच चढायांमध्ये पुणे ग्रामीण संघाने ८ गुण मिळविले तर मुंबई उपनगर पुर्व संघाने ४ गुण मिळविले. त्यामुळे अंतिम गुण संख्या पुणे ग्रामीण ३७ व मुंबई उपनगर पुर्व संघाने ३३ गुण मिळविले.

उपांत्य फेरीच्या चौथ्या सामन्यात सामन्यात अहमदनगर संघाने पिंपरी चिंचवड संघावर ३७-३४ अशी मात करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला. मध्यंतराला अहमदनगर संघाकडे १९-१० अशी आघाडी होती. अहमदनगर संघाच्या प्रफुल झावरे व शिवम पठारे या खेळाडूंनी उत्कृष्ठ चढाया करीत आपल्या संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

महिलांच्या सामन्यात पुणे ग्रामीण संघाने औरंगाबाद संघावर ५६-६ अशी दणदणीत मात करीत विजय साकारला. मध्यंतराला पुणे ग्रामीण संघाकडे ३४-२ अशी निर्णायक आघाडी होती. सातारा संघाने ठाणे ग्रामीण संघावर ४०-३५ अशी मात करीत विजय मिळविला. मध्यंतराला सातारा संघाकडे २२-१२ अशी आघाडी होती. सातारच्या श्रुती बेंद्रे व सायमा पठाण यांनी आक्रमक खेळ केला.

मुंबई उपनगर पश्चिम संघाने अहमदनगर संघावर २९-१७ अशी मात करीत विजय मिळविला. मध्यंतराला उपनगर पश्चिम संघाकडे १४-७ अशी आघाडी होती. उपनगर पश्चिमच्या कोमल देवकर, करिना कामतेकर यांनी चौफेर खेळ केला. मुंबई शहर पश्चिम संघाने बीड संघावर ७०-४ असा एकतर्फी विजय मिळविला. मध्यतराला मुंबई शहर पश्चिम संघाकडे ३६-२ अशी भक्कम आघाडी होती.

नंदुरबार संघाने सोलापूर संघावर ६३-३४ असा विजय मिळविला. मध्यंतराला नंदुरबार संघाकडे २८-२३ अशी आघाडी होती. पालघर संघाने परभणी संघावर ४२-२५ अशी दणदणीत मात करीत विजय साकारला. मध्यंतराला पालघर संघाकडे २५-१३ अशी आघाडी होती. पालघरच्या पूजा पाटील व ज्यूली मिस्कीता यांनी चौफेर चढाया करीत सहज विजय मिळविला.



सांगली संघाने नाशिक ग्रामीण संघावर ४७-१९ असा विजय मिळविला. मध्यंतराला सांगली संघाकडे २५-९ अशी आघाडी होती. सांगलीच्या श्रध्दा माळी व समृध्दी देशमुख यांनी चांगल्या चढाया केल्या. नाशिक शहर संघाने जळगाव संघाचा ६९-१४ असा दारूण पराभव केला. मद्यंतराला नाशिक शहर संघाकडे ३३-१० अशी आघाडी होती. पिंपरी चिंचवड संघाने धुळे संघावर ४४-१८ अशी दणदणीत मात करीत विजय मिळविला. पुणे शहर संघाने रायगड संघावर ३२-२७ अशी मात करीत विजय मिळविला. मध्यंतराला पुणे शहर संघ १७-२० असा पिछाडीवर होता. पुणे शहर संघाच्या आम्रपाली गलांडे हिने मध्यंतरानंतर जोरदार आक्रमण करीत विजय खेचून आणला.


**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, आॅर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.

■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**

(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)